# छात्र प्रबोधन

सौर आषाढ, शके १९३७ | वर्ष १५ अंक १०
वार्षिक वर्गणी ₹ २००/ मूल्य ₹ २०

**विद्यार्थी विशेषांक**



ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी, कृतिशीलता जोपासणारे मासिक !

## हाक तुझी परि मनी वसे

तंत्रज्ञानी नवे सहस्रक केवळ वैभव सांगतसे
अध्यात्मासह विज्ञानाची हाक तुझी परि मनी वसे।।ध्रु.।।

पार्थासम एकाग्र साधना, उग्र विरागाचीच अर्चना
संन्यस्तांच्या संघटनेला सेवेची दृढमूल प्रेरणा
शतशतकांचे द्रष्टे चिंतन तुझ्या अंतरी उमलतसे...।।१।।

सप्तसिंधुच्या पार घुमविली तू हिंदूंची विजयघोषणा
ज्ञानकर्मयोगातुन दिधली वीरत्वासह अपार करुणा
जे जे शोषित ते नारायण, पूज्य मानले देव जसे...।।२।।

आज पश्चिमा वित्तबळाने पदोपदी दुनिया झुकवी
स्वत्वाला विसरला देश हा गुलामीच त्याला सुखवी
वज्राघाती वेदान्ताची शास्त्रसंपदा हवी असे...।।३।।

राष्ट्र दीनवाणे झालेले, धर्मतेज नाही उरले
वनराजाचे गोत्र विसरता, करुण केसरी भेदरले
या भ्रांतीतुन जागे होण्या शब्द तुझे आसूड जसे...।।४।।

# छात्र प्रबोधन

सौर आषाढ, शके १९३७। वर्ष १५ अंक १०

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै - ऑगस्ट १९९२) २७६ वा अंक, वर्ष २३ अंक १२

प्रकाशन दिनांक - सौर १० आषाढ, शके १९३७/१ जुलै २०१५


ॐ

*इवली शल्ये रुपती खुपती*
*मात करू दे त्यांच्यावरती*
*प्रगल्भतेचे पंख देऊनी*
*ने ज्योतिर्जगतात*

**विद्यार्थी विशेषांक**

## • अंतरंग •


| | | |
|---|---|---|
| ४. | **संवाद** | - महेन्द्र सेठिया |
| ५. | कथा... **'मित्रा'चे अंगणी** | - कु. रोहिणी जोशी |
| ८. | कविता... **छाया ओल्या दुष्काळाची** | - चि. श्रेयस पांडे |
| | **पाऊस...** | - कु. वेदश्री सिनकर |
| ९. | ललित... **येरे येरे पावसा** | - चि. अमोघ वैद्य |
| ११. | प्रेरणादायी... **ऑलिंपियाड विजेता- अभिषेक देढे** | |
| १४. | स्फुट ... **सोडवा हे शब्दकोडे** | - चि. आदित्य आसबे |
| १५. | माहितीपर... **देखणे कुरल** | - कु. तेजल मेखे |
| १७. | ललित... **मुक्त चिंतन** | - कु. सई कामत, कु. तृप्ती मोरे, - कु. तन्वी बोरा |
| २०. | वेचक वेधक ... **पेट्रोल-डिझेलची झाडे?** | - संकलित |
| २१. | माहितीपर... **सिंधू संस्कृती-एक प्राचीन संस्कृती** | - कु. अनन्या जोगळेकर |
| २४. | अनुभवपर... **पंढरीची वारी** | - कु. गार्गी देवचके |
| २५. | चित्रपट परिचय... **Fast and Furious - 7** | - चि. रुचिर कुलकर्णी |
| २६. | कविता... **ओढ** | - कु. वेदश्री पुराणिक |
| २७. | प्रासंगिक... **।।तस्मै श्रीगुरवे नमः।।** | - कु. मानसी पूरकर |
| २९. | कथा... **आणि... तिचे डोळे उघडले** | - कु. अश्विनी पाटील |
| ३१. | अनुभवपर... **सफर शिवथरघळीची** | - कु. देवश्री जोगळेकर |
| ३३. | ललित... **हॅलो, मी मोबाईल बोलतोय** | - चि. यदुनाथ कुलकर्णी |

मुखपृष्ठाच्या आतील पानावरील पद्य...

**हाक तुझी परि मनी वसे** - रामभाऊ डिंबळे

**याशिवाय -** पुणेरी पाट्या (२०), स्पर्धा निवेदन (२६), अविस्मरणीय सहल (३२), प्रतिसादी वाचकवीर व्हा..., विज्ञान प्रयोग (३४)


**तळटिपेतील ओळी -** भारतातील सर्वात 'मोठे', 'उंच' व 'लांब' यांविषयी... पानाखालील काव्यपंक्तीत संतांची वचने दिली आहेत.

**मुखपृष्ठाविषयी -** चित्रात दाखवलेल्या मुलांप्रमाणे प्रत्येक मुलामध्ये उत्साह, चैतन्य, जोश दडलेला असतो. चित्रात काढलेले रंगीबेरंगी लहान - मोठे गोल हे अशा सकारात्मक भावनांचे प्रतीक आहे. चित्र काढताना पोस्टर कलर आणि क्रेयॉन्सचा वापर केला आहे.

**- कु. जान्हवी लेले**


**♦ संपादक, प्रकाशक, मुद्रक ♦**

महेन्द्र सेठिया

**♦ कार्यकारी संपादक ♦**

शिल्पा कुलकर्णी

**♦ संपादक मंडळ ♦**

शैलजा देशमुख, नीलिमा करमरकर, डॉ. कांचनगंगा गंधे, आश्लेषा महाजन

**♦ विद्यार्थी संपादन साहाय्य ♦**

कु. रोहिणी जोशी, कु. पर्णवी कुलकर्णी कु. देवश्री जोगळेकर, कु. गार्गी देवचके, कु. अनन्या जोगळेकर, कु. सई लिमये

**♦ मुखपृष्ठ ♦**

कु. जान्हवी लेले

**♦ आतील चित्रे ♦**

चि. अनमोल दातार

**♦ संपर्क पत्ता ♦**

छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९

**संकेतस्थळ**

www.chhatraprabodhan.org

**ई-मेल -**

chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**मासिकाची वर्गणी**

**वार्षिक :** ₹ २००, **द्वैवार्षिक :** ₹ ४००, **त्रैवार्षिक :** ₹ ५५०, **दशवार्षिक :** ₹ १,७००.
या अंकाची किंमत : ₹ २०
(पुण्याबाहेरील धनादेशासाठी - ₹ २० जादा, घरपोच दिवाळी अंकासाठी प्रतिवर्षी ₹ ४० जादा)


**या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.**

**छात्र प्रबोधन :** निव्वळ मासिक नव्हे !... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!

**अधिक माहिती मिळवा...** सर्वात जलद रेल्वे - शताब्दी एक्सप्रेस (नवी दिल्ली ते भोपाळ)


**प्रायोजक - श्री. चिंतामणी बने, डोंबिवली**

**योगाचरण करू इच्छिणाऱ्या प्रिय प्रबोधकांनो,**

संवाद

२१ जूनला आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने जगभरातल्या सुमारे १९७ देशांमधल्या लाखो लोकांनी योगाभ्यासाची प्रात्यक्षिके केली. तुम्हीही तुमच्या शाळेमध्ये योगासने–प्राणायाम–सूर्यनमस्कार इ. गोष्टी केल्या असतील. आपल्या प्राचीन भारतीय संस्कृतीतली एक महत्त्वाची गोष्ट संपूर्ण जगाने स्वीकारली याचा मला मनापासून आनंद झाला अन् अभिमानही वाटला. पण निव्वळ एका दिवसाच्या प्रात्यक्षिकांपुरतं आपण थांबून चालणार नाही. तुमच्या दैनंदिन जीवनात योगाचरण कसे करता येईल याचा विचार खरंतर तुम्ही सर्वांनी जाणीवपूर्वक करण्याची सुरुवात या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने करायला हवी. तसं झालं तर आपल्या आचरणातून, आपल्या रोजच्या वागण्या–बोलण्यातून खऱ्या अर्थाने योगाचे महत्त्व संपूर्ण जगाला पटेल.

युक्ताहार विहार, इंद्रियसंयमन, दैनंदिन उपासना, स्वाध्यायप्रवचन, सद्गुरूसेवा आणि राष्ट्रसेवा या व्रतांचे पालन करणं म्हणजे खरंतर शालेय वयापासून योगाचरणाला प्रारंभ करणं. रोजचा आपला व्यायाम, हालचाली, खेळ, विश्रांती आणि आहार हा शारीरिक विकासाला पोषक, शारीरिक तंदुरुस्ती आणि निरोगीपणा वाढण्यासाठी उपयुक्त कसा होईल हे समजून घेणं आणि त्यानुसार कृती करणं म्हणजे 'युक्त–आहार–विहार' करणं. योगासने, प्राणायाम, सूर्यनमस्कार, अन्य व्यायामप्रकार, सायकल चालवणं, धावणं, पोहणं, डोंगर चढणं, विविध प्रकारचे वैयक्तिक आणि सांघिक खेळ खेळणं यापैकी २–३–४ गोष्टी तरी तुमच्या रोजच्या दिनक्रमाचा भाग व्हायला हवा. रोज इतकं दमायला हवं की रात्री झोपण्यासाठी पाठ टेकली की २ मिनिटांत गाढ झोप लागली पाहिजे अन् खाण्याच्या वेळेला इतकी खरपूस भूक लागली पाहिजे की ताटात/डब्यात जे असेल ते अत्यंत आवडीने खावंसं वाटेल.

जे करायला, पाहायला, ऐकायला, खायला आपल्याला खूप आवडतं ते आपण करत असतोच. पण ते सगळं आपल्या विकासाला पोषक, आपल्या हिताचं असतंच असं नाही. त्यामुळे आपल्या हिताचं काय आहे, दीर्घकाळ उपयोगी पडणारं काय आहे हे हळूहळू समजणं अन् मग आपल्या आवडींवर नियंत्रण मिळवता येणं, हे जमायला लागणं म्हणजे 'इंद्रिय संयमन.' हा योगाभ्यासच आहे. पिझ्झा, बर्गर, बिस्किटे, वेफर्स, वडापाव, भेळ, पाणीपुरी हे खायला खूप आवडतं म्हणून सकाळ–संध्याकाळ रोज तेच खाऊन चालेल का? टिव्ही, कॉम्प्युटर, मोबाईल पाहायला, त्याच्याशी खेळायला खूप आवडतं म्हणून तासन्‌तास तेच करत राहिलं तर चालेल का? विविध गाणी, संगीत ऐकायला खूप आवडतं म्हणून दिवसभर कानाला यंत्र लावून ऐकत बसलं तर ते योग्य होईल का? त्यामुळे विद्यार्थी म्हणून उत्तम अभ्यास करण्यासाठी, विविध प्रकारची कौशल्ये हस्तगत करण्यासाठी, विविध प्रकारचे अनुभव घेण्यासाठी जास्तीत जास्त वेळ व शक्ती कशी वापरता येईल आणि त्यासाठी आपल्या ज्ञानेंद्रियांच्या अन् कर्मेंद्रियांच्या कृतीवर नियंत्रण कसं मिळवता येईल हे पाहणं म्हणजे योगाचरणाची पुढची पायरी!

या दोन पायऱ्यांनी योगाचरणाला डोळसपणे अन् ठरवून प्रारंभ करा, टप्प्याटप्प्याने त्याच्या पुढच्या पुढच्या पायऱ्या 'संवाद'मधून मी लिहीत जाईन. तुम्ही सर्व प्रबोधकांनी शालेय वयापासूनच योगाचरणाला प्रारंभ करावा असं मनापासून वाटतं म्हणून हा लेखन प्रपंच!

**या अंकासोबतच छात्र प्रबोधनने २३ वर्षे पूर्ण केली याचाही मनापासून आनंद वाटतोय. शिवाय हा अंक 'विद्यार्थी विशेषांक' आहे.** संपादन, लेखन, सजावट, चित्रे इ. सगळ्या गोष्टी मुलामुलींनीच केल्या आहेत. त्या सर्वांचे मनापासून अभिनंदन! ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील इ. नववीतील मुलींचे विशेष कौतुक! हा अंक तयार होण्यात त्यांचा मोलाचा सहभाग आहे. अंकाचे संपादन करण्यासाठी पुष्कळ प्रकारची कामे करावी लागतात. त्यासाठी भरपूर वेळही द्यावा लागतो. अंक वेळेत व दर्जेदार निघण्यासाठी अनेक छोट्या–मोठ्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. अनेक गोष्टी शिकायला मिळतात. मासिकाशी निगडित काम करणाऱ्या विविध व्यक्तींबरोबर काम करण्याची, विचार करण्याची संधी मिळते. अशी संधी या संपादनात साहाय्य करणाऱ्या विद्यार्थ्यांनी कमी–अधिक प्रमाणात घेतली म्हणून त्यांचे विशेष कौतुक! येत्या वर्षभरात तुमच्यापैकी अधिकाधिक जणांनी ही संधी आवर्जून घ्यावी, त्यासाठी वर्षातून एकदाच निघणाऱ्या विद्यार्थी विशेषांकाची वाट पाहायचे कारण नाही. दर महिन्याच्या अंकाच्या वेळीही तुम्ही ही संधी घेऊ शकता. इच्छुक विद्यार्थ्यांनी संपर्क करून आपली इच्छा व्यक्त करावी. व्यावहारिक तपशीलाबाबत त्यांच्याशी संपर्क केला जाईल.

'अभिवाचन स्पर्धे'मध्ये आवर्जून सहभागी व्हा! दिवाळी अंकाच्या कामांना प्रारंभ झाला आहे. तुमच्या अपेक्षा, सूचनांचे स्वागत आहे.

**तुमचा दादा,**

**(महेन्द्र सेठिया)**

*तू माऊलीहुनि मायाळू, चंद्राहुनि शीतळ। पाणियाहूनि पातळ, कल्लोळ प्रेमाचा।।*

**अधिक माहिती मिळवा...** सर्वात मोठे प्राणी संग्रहालय –अलिपूर (कोलकता) येथील झूऑलॉजिकल गार्डन

**प्रायोजक - डॉ. कीर्ती आपटे, पुणे** - दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा.

# ‘मित्रा’चे अंगणी

**– कु. रोहिणी जोशी**

**विज्ञानातल्या अद्भुत ‘जादूबाबत’ सगळ्यांनाच खूपच आकर्षण वाटतं. लहानपणापासून परग्रहावर जाण्याची स्वप्नं बघणाऱ्या चिमुरड्याची, आणि त्याच्या ‘मित्रा’ची गोष्ट सांगत आहे या विज्ञानकथेतून...**



आज या भयानक प्राण्यांच्या प्रदेशात पोचल्यावर मला मी आठवीत असतानाचा प्रसंग आठवतो. शाळेत असताना एकदा आमच्या सरांनी एक विज्ञानकथा सांगितली होती. त्यातून या प्राण्याची माहिती आम्हाला समजली होती. माणसाला नेहमीच परग्रहवासीयांबाबत, विश्वाच्या निर्मितीबाबत, समांतर जीवनाबाबत, कालयंत्राबाबत अत्यंत कुतूहल वाटत आले आहे. भविष्यात कालयंत्राचा शोध लावण्याची प्रतिज्ञा आमच्या काळचे अनेक बालसंशोधक घेत. पण या सगळ्या ‘फॅन्टसीज’ पुस्तकातील विज्ञानकथांखेरीज कुठेही दिसल्या नव्हत्या. फार काय, आज प्रत्यक्षात असलेले आयुर्मर्यादा वाढवण्याचे शोध, प्लुटो ग्रहावर होणारे ‘ट्रेक्स’ आणि ‘बोलू’ शकणारी जीवसृष्टी कधी काळी निर्माण होईल, असे एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला कोणाला वाटलेही नसेल.

आम्ही साधारण सहावीत असताना वेगळ्या सूर्यमालेतील एका ग्रहावर पाण्याचा आणि वातावरणाचा शोध लागला होता. खूप वर्षांपूर्वी ‘मंगळ’ नावाच्या एका ग्रहावरदेखील असाच अयशस्वी ‘आरोप’ करण्यात आला होता. त्यामुळे हा शोधदेखील फारसा गांभीर्यानं घेतला गेला नव्हता. परंतु शास्त्रज्ञांच्या म्हणण्यात तथ्य आहे असे काही दिवसातच सिद्ध झाले. याचाच पुरावा म्हणून त्या ‘टास्कालिगा’ ग्रहावर जीवसृष्टी आहे. ही जगभरात खळबळ उडवणारी बातमी सिद्ध झाली. पृथ्वीखेरीज या वेगळ्या ग्रहावरच्या सजीवाचे **‘मित्र’** असे नामकरण केले गेले. शाळेतल्या त्या तासाला सर याच ‘मित्राची’ माहिती सांगत होते.

बोटाएवढा, फारतर हाताएवढा मित्र हा, लाल रंगाचा एक रेखीव प्राणी. या लांबुळक्या मित्रावर काळ्या ठिपक्यांची नाजूक नक्षी होती. त्यातून पिवळ्या रंगाचे सहा सुबक हातपाय बघता, हा प्राणी अजूनच मनामध्ये ठसत असे. या मित्राची खासियत म्हणजे वेगवेगळे स्राव सोडण्याची अद्भुत शक्ती. मित्राचा आकार तुलनेने छोटा असला, तरी त्याने निमुळत्या सोंडेतून सोडलेल्या चिकट स्रावांना माणसाने अडवण्याची शक्यता फारच कमी होती. पंखांशिवाय हवे तिथे हवे तसे उडण्याची क्षमता त्याच्यात होती. त्यांचा किरटा आवाज त्यांच्या एकंदरीत अवताराला साजेसा होता. तरी त्यांचे डॉल्फिनसारखे खट्याळ डोळे मानव-मित्राच्या मैत्रीची साक्ष देत होते.

पृथ्वीवरून घेतलेल्या छायाचित्रांवरून आणि ‘व्हिडिओ क्लिप’ मधून मिळालेल्या या माहितीवर समाधानी राहील, तो

*पिटूं भक्तीचा डांगोरा, कळिकाळासी दरारा। तुका म्हणे करा, जयजयकार आनंद।।*

**अधिक माहिती मिळवा...** सर्वात मोठा समुद्र किनारा – मरीना बीच, चेन्नई

**प्रायोजक – बडवे इंजिनियर्स, प्रा. लि., पुणे**

माणूस कसला! सतत नवनवीन शोधण्याच्या या वृत्तीने माणसाला इथेही शांत बसू दिले नव्हते. या मित्रांची माहिती काढण्यासाठी आणि मैत्रीचा प्रस्ताव मांडण्यासाठी याआधी तीन वेळा शास्त्रज्ञांचे गट टास्कालिगावर गेले होते. या ग्रहाच्या मित्रांच्या माहितीबाबत आणि शास्त्रज्ञांबाबत ती सरांनी वाचून दाखवलेली विज्ञानकथा होती.

त्या विलक्षण कथेने मी आठवीपासूनच भारावून गेलो होतो. आणि आज टास्कालिगावर चौथा शास्त्रज्ञ म्हणून जाण्याचे माझे हे स्वप्न पूर्ण होत होते. सरांनी सांगितलेले सारे मला आता प्रत्यक्षात बघायला मिळत होते.

टास्कालिगा ग्रहावरच्या वातावरणाचा, त्या मित्रांचा आणि अजून न परतलेल्या पृथ्वीवरच्या शास्त्रज्ञमित्रांचा मला शोध लावायचा होता. या छोट्याशा मित्रांनी उभारलेले अवाढव्य जग हाही माझ्या संशोधनाचा विषय होता. या आधीच्या शास्त्रज्ञमित्रांच्या शेवटच्या सुचनेनुसार, मित्रांच्या स्रावाने निकामी होणार नाही अशा पदार्थांचे यान माझ्यासोबत होते. यान ग्रहावर पोचायला फक्त काही मिनिटे बाकी होती. पुढे काय घडणार, याविषयी मनात कुतूहल व अनामिक भीती होती.

यान ग्रहावर यशस्वीपणे उतरले. पण माझ्या कल्पनेतले तेथे काहीच दिसत नव्हते. सगळीकडे हिरवीगार वनश्री, भलीमोठी झाडे दिसत होती. जिथे अनेक लाल-काळे, दोन शिंगांचे, एका सोंडेचे मित्र माझाच वेध घेत होते. त्यांच्या प्रगत तंत्रज्ञानामुळे ते माझ्याशी चक्क मराठीतून संवाद साधू शकत होते. या वनराईमुळे आणि भाषेच्या आपलेपणामुळे मला अगदी घरच्यासारखे वाटत होते. निळ्याशार नदीसमोरच्या एका लाकडाच्या प्रशस्त घरात माझे जंगी स्वागत झाले. त्या आदरातिथ्याने आणि खाद्यपदार्थांच्या सरबराईने मी अगदी तृप्त झालो होतो. त्यांनी केलेले मानपान आम्हा भारतीयांनाही लाजवणारे होते. मित्रांनी आमची मैत्री मान्य केल्याचे दिसत तर होते.

टास्कालिगावर संशोधन करण्याची संधी म्हणजे फार मोठी पर्वणीच होती. तेथील वातावरण संशोधनाला खूपच अनुकूल होते. पृथ्वीवासीयांना लाजवेल अशी स्वच्छता, प्रगती माझ्या नजरेत भरत होती. विशाल निसर्गाप्रमाणे छोट्या मित्रांची मनेही मोठी होती. तंत्रज्ञानात अतिप्रगत असलेले हे मित्र म्हणजे खरोखरच टास्कालिगाची शान होती. परिसरात गुरुत्वाकर्षण आणि प्राणवायूचा अभाव असल्याने माझ्या राहण्याच्या मठीत अगदी पृथ्वीसारखे वातावरण तयार करण्यात आले होते. बाजूला विस्तीर्ण समुद्र पाहिल्यावर आपल्या भारताची वारंवार आठवण येत होती.

काही काळातच माझे संशोधनाचे काम पूर्ण होत आले. या संशोधनाच्या निमित्ताने मला मित्रांच्या एकंदर जीवनशैलीचा सखोल अभ्यास करता आला; पण मी केलेल्या अभ्यासाला 'सखोल' म्हणणे हे कदाचित माझ्यातल्या वैज्ञानिकाला आणि प्रामाणिक माणसाला अयोग्य वाटेल कारण प्रत्यक्ष 'मित्रां'बाबत मला फारशी माहिती मिळू शकली नव्हती; पण टास्कालिगा बाबत मिळालेली माहिती माझे उद्दिष्ट पूर्ण करायला पुरेशी ठरत होती. याचे कारण असे की, स्वत:ची माहिती न कळू देता दुसऱ्याबाबत जास्तीत जास्त जाणून घ्यायच्या कलेत 'मित्र' वाकबगार होता. पृथ्वीबाबत, माणसांबाबत आमच्या नेहमीच चर्चा होत असत.

हा त्यांच्या सूर्यमालेतील पहिला ग्रह असून त्याचा आकार आपल्या सूर्यापेक्षाही प्रचंड होता. त्याचा 'विनुया' हा राक्षसी तारा त्यांच्या ग्रहाच्या अधिकच जवळजवळ येत असल्याने टास्कालिगाचे तापमान ११५०$^{0}$ सेल्सियस पेक्षा जास्तच होते. टास्कालिगा ग्रह महाभयंकर स्टिंझ्रॅक कृष्णविवराजवळ असला तरी ग्रहावर अजिबात गुरुत्वाकर्षण नव्हते. पृथ्वीवरील तंत्रज्ञानाच्या कमतरतेमुळे मित्र पृथ्वीवरून जरी

लहान दिसत असले, तरी त्यांची उंची २-२।। फूट असावी. अशाप्रकारे माझे संशोधनाचे दिवस संपत आले होते...

आज मी टास्कालिगाच्या दुसऱ्या प्रतलावर जाऊन नंतर पृथ्वीवर परतणार आहे. मी गेली पाच वर्ष जिथे राहिलो त्या ठिकाणचा निरोप घेताना दु:ख वाटत आहे. या परग्रहीय संस्कृतीची ओळख टास्कालिगा ग्रहावरच्या निसर्ग सादर्याइतकींच मनाला सुखावणारी आहे. मित्रांना लाख लाख धन्यवाद देत या सुखद आठवणी सोबत घेऊन मी ग्रह सोडलेला आहे...

पण अजूनतरी मला आधीच्या तीन शास्त्रज्ञ मित्रांचे अवशेष सापडलेले नाहीत. आणि माझा पुढचा सगळा धोक्याचा प्रवास स्टिंझ्रॅक कृष्णविवराच्या जवळून आहे. पण मी ती जोखीम पत्करत आहे. खरंतर, दुसऱ्या ग्रहावर जाऊन राहायचे मी मोठे धाडसच केले आहे. मी टास्कालिगाकडे शेवटचं वळून पाहिलं आणि प्रवासाला सुरुवात केली. काही वेळात कंट्रोल रूमच्या पडद्यावर सांकेतिक लिपीमध्ये खालील संदेश आले.

**Δ □✡❁E N ⊙**

त्याचे *डिकोडिंग* केले गेले. 'यान RJ-1729 'विनुया' सूर्यमालेतून परतताना यंत्रणेत बिघाड. यान स्टिंझ्रॅक कृष्णविवराजवळ असण्याचा कयास.' टास्कालिगा ग्रहाजवळून येणाऱ्या संदेशांमध्ये अनियमितता. 'कन्ट्रोल रूमचे' सारे कर्मचारी चिंतामग्न अवस्थेत. मित्रांची माहिती मिळवण्यासाठी गेलेला चौथा शास्त्रज्ञ धोक्यात असल्याची कल्पना.

यान स्टिंझ्रॅक कृष्णविवरात खेचले जात आहे. चालक शिताफीने प्रयत्न करतच आहे. चालक अखेरीस अयशस्वी ठरत आहे. दोन पिवळी याने RJ-1729 ला स्टिंझ्रॅकच्या केंद्रस्थानी ढकलत आहेत. ही दोन्ही पिवळी याने UFO सदरात टाकली गेली आहेत. RJ-1729 च्या चालकांच्या विरोधाला न जुमानता पिवळी याने RJ-1729 ला विवरात आतमध्ये ढकलतच आहेत. ही याने 'मित्रांची' असल्याचा अंदाज वर्तवला गेला आहे. 'कंट्रोल रुमच्या' पडद्यावर या दृश्याखेरीज अजून तीन गोष्टी दिसल्या. त्या वस्तू म्हणजे याआधी टास्कालिगावर पाठवल्या गेलेल्या तीन यानांचे अवशेष असल्याची शक्यता आहे.

कंट्रोल रुममधल्या कर्मचाऱ्यांमध्ये नीरव शांतता. चालकाचे अयशस्वी प्रयोग सुरूच.

**Δ □✡❁E N**



कंट्रोल रुममध्ये RJ-1729 मधून उत्तर आलेले आहे. 'मित्र हे प्रत्यक्षात मित्र वाटत नाहीत. मानवांना त्यांच्या ग्रहावर बोलवून पृथ्वीबद्दलची जास्तीत जास्त माहिती काढून घेण्याचा हा प्रयत्न आहे. 'विनुया' या राक्षसी ग्रहाने टास्कालिगाला गिळंकृत करण्यापूर्वी तिकडची वस्ती पृथ्वीवर हलवण्याचा हा कट आहे. तसेच ही माहिती पृथ्वीपर्यंत न पोचण्यासाठी टास्कालिगावर आलेल्या शास्त्रज्ञाला नष्ट करण्याची, भयंकर स्टिंझ्रॅक विवरात पाठवण्याची ती योजना आहे. मानवांनो सावधान! पृथ्वीवर 'मित्रां'चा डोळा आहे.'

RJ-1729 यानाचा पृथ्वीसोबतचा संपर्क पूर्णपणे तुटला आहे... ✧✧

**कु. रोहिणी जोशी** (इ. ९वी)
ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे
**चित्रकार–** कु. संहिता फणसळकर

*देवो देवपणें ठाटला, भक्त भक्तपणें आटला। दोहोंचाचि अंतु झाला, अभेदों झाला अनंतु।।*

**अधिक माहिती मिळवा...** सर्वात मोठी किनारपट्टी असलेले राज्य – गुजरात

**प्रायोजक - डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, ग्लास्गो, स्कॉटलंड**

# छाया ओल्या दुष्काळाची

आज पुन्हा एकदा धडकी भरली
अवेळी पावसाने जमीन भिजली
कित्येक पिकांनी माना असतील टाकल्या
अन् झाडांच्या फांद्या असतील वाकल्या
अनेक फळांचं झालं असेल नुकसान
शेकडो टन वाया गेलं असेल सामान
आज बाहेरपेक्षा जास्त पाणी
त्यांच्या डोळ्यात असेल
कित्येकांचे अस्तित्व आज आहे... पण उद्या नसेल
शहरवासीयांच्या कर्माची शेतकऱ्यांना नको शिक्षा
देवा त्यांचं शेत वाचव रे... तुला मागतो मी भिक्षा

**– चि. श्रेयस पांडे** (इ. ९ बी), रचना विद्यालय, नाशिक



# पाऊस...



टपटप पडती थेंब चिमुकले
घननिळ्या आभाळातून
जलस्पर्शाने पावन झाली
धरती हिरवाळीतून।।

सुंदर सुगंध धरतीमधून
जणू आनंदाचा परिमल
बळीराजा आनंदला पाहून
अंकुर सुकोमल।।

शालू नेसुनी फुलाफुलांचा
धरती पुरवी हौस
सण–उत्सवांची पर्वणी
मुलांची मौजच मौज।।

पोथ्यांच्या निरूपणातुनी
बरसू लागे भक्तिभाव
वारकऱ्यांच्या पंढरीत
विठू घेई मनीचा ठाव।।

**– कु. वेदश्री सिनकर** (इ. ११ वी)
राजस अपार्टमेंट, मयुर कॉलनी, कोथरुड, पुणे



*राया जो निर्मळु, निष्कल लोक कृपाळु। शरणागता प्रतिपाळु, शरण्यु जो।।*



**अधिक माहिती मिळवा...** सर्वात जास्त लांबीची नदी – गंगा

**प्रायोजक - कु. रेवती सारंग वऱ्हाडपांडे, पुणे**

# येरे येरे पावसा...

– चि. अमोघ वैद्य

पाऊस !!! हा शब्द ऐकताच मनामध्ये एक आल्हाददायक भावना निर्माण होते. पावसाळा हा प्रत्येकासाठी आनंद व नवीन अनुभव घेऊन येणारा असतो. प्रत्येकजण पावसाशी आपलं भावनिक नातं जोडत असतो. अशा पावसाचा अभ्यास केल्यानंतर मी त्याचे आठ प्रकार शोधून काढले आहेत. आपल्याला या आठांपैकी कोणत्या पावसात भिजायचे आहे ते ठरवावे!

तर...

पहिला प्रकार आहे **लहरी पाऊस**!

या प्रकाराचे वैशिष्ट्य म्हणजे हा पाऊस त्याच्या मनासारखा पडतो. हवा तेवढा पडतो. म्हणजे उदाहरणार्थ बघा हं... दारावरची बेल वाजावी, आपण दार उघडावं आणि वर्षानुवर्ष न भेटलेला आगंतुक नातेवाईक न सांगता दारात यावा! मग कधी जायचं हे मात्र त्याच्या इच्छेवर! तसाच हा पाऊस. कधीही येतो, 'लहर आल्यासारखा' हवा तेवढा पडतो. कधी थोडाफार पडतो आणि निघून जातो, तर कधी मुसळधार. गारा न पडणाऱ्या प्रदेशात कधी कधी गारा पडतात ना, ते याच प्रकारामुळे.

जर या पावसात तुम्हाला भिजायचं असेल तर खूप तयारीत राहावं लागेल. कारण हा पाऊस कधी पडेल, केवढा पडेल हे काऽऽही सांगता येत नाही. अगदी नंदीबैलालासुद्धा.


यानंतर पुढचा प्रकार येतो तो **कृत्रिम पाऊस**! या प्रकारचा पाऊस चित्रपट मालिका किंवा स्वत:च्या आनंदासाठी वापरतात. या प्रकाराचं वैशिष्ट्य म्हणजे हा पाऊस फक्त नट–नटींवर पडतो. आजूबाजूची झाडं, दुकानं, घरं इ. यांच्यावर पडत नाही. आपण हा पाऊस कुठल्याही चित्रपट किंवा सिरीयलमध्ये बघू शकता. यानंतर *'रेन डान्स'* हाही याच प्रकारात येतो. तसंच आंघोळ करताना वापरला जाणारा *शॉवर* हाही याच प्रकारातला.

आता या पावसात तुम्हाला भिजायचंय का? तर मग खुशाल भिजा. कारण हा पाऊस फक्त आणि फक्त आपल्यासाठीच असल्यानं त्याचा आनंद आपण आपल्या लहरीप्रमाणे घेऊ शकतो.

आता पुढचा प्रकार आहे **धांदल उडवणारा पाऊस**!

हा प्रकार जरा लोकांना वैताग आणणारा आहे. धांदल पाऊस म्हणजे, 'दोन दिवसांत मान्सून केरळ किनारपट्टीवर येईल' अशी बातमी येते. 'अजून दोन–तीन दिवसानंतर रेनकोट, छत्र्या काढू.' अशी आपल्या मनाची तयारी होते. महत्त्वाची कामं पावसाच्या आधी उरकण्यासाठी आपण घरातून बाहेर पडतो... आणि पाऊस सुरू होतो आणि मग एकच धांदल सुरू होते. छत्र्या काढणे, रेनकोट काढणे, काहीजण रस्त्याच्या कडेला थांबतात. बरं याच वेळेस बरोब्बर मुलांच्या शाळा सुटलेल्या असतात. त्यामुळे मुलं दप्तर सांभाळावं का डोकं, या विचारातच ओली होतात. तर अशी सगळी धांदल या प्रकारात घडते. लग्नात एखादी वस्तू नसेल तर जशी धांदल उडते त्याप्रमाणे काहीशी ही धांदल उडालेली असते. या प्रकाराच्या पावसात भिजण्यात काहीही अर्थ नाही. कारण तुम्हाला त्याचा आनंद घेता येणार नाही. (इच्छा असो वा नसो, तो तुम्हाला भिजवणारच!)

पुढील प्रकार आहे **ऊन पाऊस**! (लहानपणी आम्ही त्याला 'नागडा पाऊस' म्हणत असू.) ज्या लोकांना पाऊस आवडत





*मूलतो ब्रह्मरूपाय, मध्यतो विष्णुरूपिणे। अग्रत: शिवरूपाय वृक्षराजाय ते नम:।।*

**अधिक माहिती मिळवा...** सर्वात मोठा पूल – गंगा नदीवरील – महात्मा गांधी सेतू, पटणा

**प्रायोजक - सौ. प्राची अमर परांजपे, सांगली**



नाही त्यांच्यासाठी हा पाऊस, माफ करा, ऊन... थोडक्यात, हा प्रकार चांगला व आनंदी ठरतो.

या प्रकारात ऊनही पडलेले असते आणि पाऊसही पडत असतो; म्हणजे एखादा प्रश्न विचारल्यानंतर 'हो' पण, आणि 'नाही' पण असं उत्तर मिळतं ना, तसंच या प्रकारात घडतं. यामुळे कुठं उशीर झाला, तर पावसात अडकलो होतो हे सांगायला सोपं जातं.

आता या पावसात भिजायचंय का? तर आनंदाने भिजा! कारण पावसात भिजल्यानंतर उन्हामुळे कपडेही लवकर वाळतात. याच प्रकारात तुम्हाला इंद्रधनुष्यही पाहायला मिळेल म्हणजे हा प्रकार प्रचंड फायदा देणारा आहे.

यानंतर प्रकार आहे **एकच ऋतू पाऊस!**

हा प्रकार म्हणजे एखादा मोठा पक्ष उभा राहातो आणि बाकीचे सर्व पक्ष छोटे आहेत असं म्हणतो ना तो हा प्रकार. म्हणजे या प्रकारातला पाऊस उन्हाळ्यातही पडतो, पावसाळ्यात तर पडतोच पडतो आणि हिवाळ्यातही पडतो. त्यामुळे नक्की ऋतू कुठला आहे हे कळतच नाही. काही वेळेस तर उन्हाळ्याच्या सुट्टीत पडला तर भीती वाटते, की शाळा कॉलेजेस् सुरू झाली की काय? बघता बघता सुट्टी संपली असंही काहीसं वाटू लागतं. तर अशा या पावसात भिजायचं का? तर मग भिजा! कारण 'पडू आजारी, मौज हीच वाटे भारी' याचा प्रत्यय नक्की येतो.

पुढचा प्रकार आहे **गर्जेल तो पडेल काय?**

या प्रकारात आकाशात भरपूर ढग जमा होतात. भर दुपारी अंधार पडतो. विजा चमकतात. आता जबरदस्त पाऊस पडेल असंही वाटतं. पण 'पडतो की काय' असं भासवणारा पाऊस काही क्षणातच निघून जातो आणि जाताना गडगडाट करत हसत जातो. म्हणजे थोडक्यात काय, आपला 'पोपट' होतो. या पावसात आपल्याला भिजता येत नाही.

पुढचा प्रकार आहे **रात्रीचा पाऊस!** हा प्रकार आत्ताच निघाला! (शोधला!!!) या प्रकारातला पाऊस रात्रीच सुरू होतो (पडतो) आणि सकाळपर्यंत थांबतो. एखाद्या नोकरी करणाऱ्या माणसासारखा हा पाऊस 'रात्री सुरू, सकाळी बंद' असं करतो. कधी कधी *ओव्हरटाईमही* करतो. या पावसात भिजण्यासाठी जागायची तयारी हवी.

या पुढील आहे **कंटाळवाणा पाऊस!**

हा पाऊस म्हणजे आठवडाभर चालतो आणि मग कंटाळा यायला लागतो. साधारणपणे पावसाळ्याच्या शेवटी हा प्रकार दिसून येतो. असा पाऊस सुरू झाला की समजायचं, पावसाळा संपत आला. 'भिजायचंय का?' हा प्रश्नच मुळी इथे कंटाळवाणा वाटायला लागतो.

तर असे मी आठ प्रकार तुमच्यापुढे ठेवले आहेत. हे मुख्य भाग आहेत तसेच काही छोटे उपप्रकारही आहेत. म्हणजे 'भजी पाऊस' म्हणजे भजी खाण्यापुरता पाऊस. 'अर्धा पाऊस' म्हणजे एके ठिकाणी पाऊस पडतोय व दुसरीकडे अजिबात पाऊस नाही.

आता यापैकी कुठल्या पावसात भिजायचं, हे मात्र तुम्ही ठरवायचंय. पण मला मात्र कुठलाही पाऊस आनंददायीच वाटतो आणि मी त्याची आतुरतेने वाट बघत असतो.

✧✧

– **चि. अमोघ वैद्य** (इ. १२ वी)
१३३६, शुक्रवार पेठ, पुणे – २



*येई गा तूं मायबापा, पंढरीच्या राया। तुजवीण शीण वाटे, क्षीण झाली काया।।*



**अधिक माहिती मिळवा...** सर्वात मोठे सरोवर – वूलर सरोवर, काश्मिर

**प्रायोजक – श्री. क्षेत्रपालेश्वर ट्रस्ट, पुणे, ☎ ०२०- २४४५०९७५**

# ऑलिंपियाड विजेता - अभिषेक देढे



**अभिषेक देढे हा ज्ञान प्रबोधिनी प्रशालेचा माजी विद्यार्थी. यंदा आंतरराष्ट्रीय स्तरावर *फिलॉसॉफी* ऑलिंपियाडमध्ये रौप्यपदक मिळवलेला हा अभिषेकदादा. तसेच बल्गेरिया येथे *Linguistics* ऑलिंपियाडमध्येही तो सहभागी होणार आहे. ऑलिंपियाडविषयी तुमच्या मनात असलेलं कुतूहल, प्रश्नांबाबतची उत्तरं त्याच्याशी झालेल्या गप्पांमधून तुम्हाला सापडतील.**

आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक मिळवणाऱ्या एका दादाला प्रश्न विचारणं खरंतर आम्हाला आव्हानात्मकच वाटत होतं. पण तरीही आम्ही ही मुलाखत घ्यायचा निश्चय केला; कारण या स्पर्धांबद्दल दुर्दैवानं आज फारशी कुणाला माहितीच नसते. भारतानं ऑलिंपियाडमध्ये चांगली कामगिरी केली असूनही आपल्याला त्याबद्दल माहितीही असू नये हे निराशाजनक होतं. शिवाय या स्पर्धांची माहिती यानिमित्ताने हजारो कुमारांपर्यंत पोहोचावी त्यासाठीच ही मुलाखत.

मुलाखतीच्या निमित्ताने अभिषेकदादाशी आम्ही भरपूर गप्पा मारल्या. *फिलॉसॉफी* च्या ऑलिंपियाडमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजलेला एक 'दादा' म्हणजे कोणीतरी जड-जड बोलणारा, अध्यात्म वगैरे 'जगणारा', एक गंभीर आणि अबोल मुलगा असेल, असं वाटलं होतं. पण जसजसे आम्ही बोलत गेलो, तसतसा त्याचा मिश्किल आणि बोलका स्वभाव आम्हाला समजत गेला. उलट, *फिलॉसॉफी* काहीतरी आनंददायी आणि *इंटरेस्टिंग* प्रकार आहे, असं आम्हाला वाटत गेलं. दादाने एवढी बक्षिसे मिळवली असली तरी त्याच्याशी मोकळेपणाने बोलता आलं.

**• तुझ्या घरच्या पार्श्वभूमीबद्दल तू काय सांगशील?**

माझं पाचवीपर्यंतचं शिक्षण स्वित्झर्लंड येथे झालं. त्यानंतर आई-बाबांनी परत पुण्यात येण्याचं ठरवलं. पुण्यात आल्यानंतर पाचवीला मला ज्ञान प्रबोधिनी शाळेत प्रवेश मिळाला.माझे बाबा *Software Engineer* आहेत आणि माझी आई एका कंपनीत *German translator* म्हणून काम करते. माझी आई-बाबांबरोबर बरेचदा वाद-चर्चा होते. त्याचा मला खूप उपयोग होतो.

**• प्रबोधिनीच्या पार्श्वभूमीचा तुला कशाप्रकारे उपयोग झाला?**

प्रबोधिनीचं वातावरण थोडंसं मी म्हणेन *फिलॉसॉफिकलच* होतं. त्याचा मला खूप उपयोग झाला. प्रबोधिनीमुळे मी *critical thinking* करायला शिकलो. त्याचा मला *फिलॉसॉफी* ऑलिंपियाडमध्ये खूप उपयोग झाला.

**• तुला ऑलिंपियाडमध्ये उतरावं असं का वाटलं?**

मला पहिल्यापासून जीवशास्त्राची आवड होतीच. त्यामुळे पुढे जसा जसा जीवशास्त्राचा अभ्यास करू लागलो तसे 'जीवन म्हणजे काय?' असे प्रश्न पडायला लागले. त्याची उत्तरे *फिलॉसॉफीत* मिळतील असं मला वाटलं.

*फिलॉसॉफी* म्हटलं की मुलांना आठवतं अध्यात्म, तत्त्वज्ञान आणि एकूणातच योग, अध्यात्म, ध्यानधारणा, मोक्ष यांसारखे अवजड शब्द. मुलं या सगळ्यापासून चार हात लांबच असतात. पण *फिलॉसॉफी* म्हणजे चाळिशीनंतर किंवा निवृत्त झाल्यावरच करायची गोष्ट असते का? खरंतर नाही. कारण *फिलॉसॉफी* म्हणजे केवळ तत्त्वज्ञान नव्हे. तो *फिलॉसॉफीचा* एक भाग आहे. फिलॉसॉफीमध्ये फक्त उपदेश नाही, तर चर्चा, तर्कशुद्ध विचारसुद्धा येतात.

खरंतर *फिलॉसॉफी* हा खूप महत्त्वाचा विषय आहे. जगातला प्रत्येक विषय हा *फिलॉसॉफीशी* निगडित असतो. एक गंमतशीर गोष्ट म्हणजे विकीपिडियावर तुम्ही काहीही *search* दिली, अगदी *apple* सारख्या



*देव हसुनी बोलले, नाम्या कैसे ओळखिले। येरू म्हणे खेचरे उपदेशिले, सर्वांभूती विठ्ठल।।*

**अधिक माहिती मिळवा...** सर्वात मोठे कृत्रिम सरोवर – गोविंद वल्लभ पंतसागर – सोनभद्रा, उत्तर प्रदेश



**प्रायोजक - श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे**

साध्या शब्दापासून काहीही आणि त्यात येणाऱ्या *links* पैकी पहिली *link* क्लिक करत गेलात तर ९३% वेळा शेवटी *फिलॉसॉफी* चं पान येतं. आपण याचा डोळसपणे विचार करत नाही; पण प्रत्येक क्षेत्रात *फिलॉसॉफी* असतेच. *फिलॉसॉफी* खरंतर तर्कशुद्ध विचारांशीच संबंधित आहे. म्हणूनच आपला दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे.

भारताने जरी आत्तापर्यंत ऑलिंपियाडमध्ये चांगली कामगिरी केली असली, तरी त्याबाबत समाजात जागरूकता खूपच कमी आहे. *फिलॉसॉफी* ऑलिंपियाडच्या पात्रता परीक्षेला संपूर्ण भारतातून १००-१५०च्या वर मुलं कधीच बसत नाहीत आणि यामागचं महत्त्वाचं कारण हा आपल्या समाजातला गैरसमज की *फिलॉसॉफी* म्हणजे तत्त्वज्ञान व तत्त्वज्ञान हा विषय निवृत्तीनंतर हाताळण्यासाठी असतो.

*Ethics, Asthetics* व *Metaphysics* या *फिलॉसॉफीच्या* प्रमुख शाखा आहेत. *Ethics* मध्ये मूल्ये, वागणूक, माणसाने कसे वागावे याचे नियम, मर्यादा इ. चा अभ्यास येतो. *Asthetics* मध्ये सादर्य कला, भावना अशा गोष्टींचा अभ्यास असतो. एक उदाहरण घेऊ. सादर्य म्हणजे काय? प्रत्येकासाठी 'सुंदर गोष्ट' ही वेगवेगळी असते. पण मग उद्या जर कोणी म्हटलं की, 'कचरापेटी' ही सुंदर असते, तर तुम्ही त्याला हसणं चुकीचं आहे. कारण प्रत्येकासाठी सादर्य वेगळे असते- त्याच्यासाठी ती कचरापेटी सुंदर असू शकते. *Metaphysics* हा मात्र *फिलॉसॉफीचा* गाभा म्हणता येईल. त्यामध्ये देव, सृष्टी यांसारख्या कल्पनांपासून द्वैतवाद, अद्वैतवाद व त्याबद्दलची चर्चाही असते.

**• साधारणत: आम्ही *Maths, Physics, Chemistry* च्या ऑलिंपियाडबद्दल ऐकतो. पण *Linguistics* बद्दल फारशी माहिती नसते. तर तू या ऑलिंपियाडविषयीची माहिती आम्हाला सांग.**

*Linguistics* म्हणजे *Science of Languages* या ऑलिंपियाडसाठी जास्तीत जास्त भाषा बोलता येणं वगैरे आवश्यक नसतं. एखाद्या भाषेची काहीही माहिती नसताना त्या भाषेतले *'codes'* सोडवायचे असतात. (पूर्वीच्या काळी राजाच्या दरबारी १४ वगैरे भाषा बोलणारे पंडित असत. तर तशी 'जगावेगळी' किंवा 'विचित्र महान' कामं इथं करायची नसतात.) भाषेचा कुठे, कसा वापर करायचा; एका शब्दाचे अनेक अर्थ असताना त्यातला कोणता अर्थ घ्यायचा, याबाबतची ती परीक्षा आहे. म्हणजे उदाहरणार्थ *'I play cricket with bat'* या वाक्यातल्या *bat* चा अर्थ 'लाकडाचे फळकुट' असाच घेतो. 'वटवाघूळ' हा अर्थ आपण घेत नाही. तर हे संगणकाला कसं कळणार? हे आहे *Linguistics!* तसेच मराठीमध्ये वाक्यरचना 'कर्ता-कर्म-क्रियापद' अशी असते. पण इंग्रजीत 'कर्ता-क्रियापद-कर्म' अशी असते. *'google'* मधल्या *'voice search'* ला वेगवेगळ्या माणसांनी बोललेले वेगवेगळ्या पद्धतीचे उच्चार समजून दर वेळीच योग्यच उत्तर देण्यासाठी *Linguistics* चा वापर केलेली यंत्रणा उपयोगी पडते.

*Linguistics* ऑलिंपियाडच्या माझ्या सहभागाबद्दल सांगायचं तर मी इंटरनेटवर ऑलिंपियाडबद्दल माहिती मिळवत असताना सहजच *Linguistics* चे काही प्रश्न सोडवले व मला ते खूप आवडले. माझी पात्रता फेरीत निवड झाली.

तशी ही परीक्षा दोन प्रमुख टप्प्यांवर घेतली जाते. एखाद्या वेगळ्याच भाषेची काहीही माहिती नसताना केवळ तर्काच्या साहाय्याने काही ओळींचा साधारण अर्थ शोधणे अपेक्षित असते. तसेच, वेगळ्या भाषेतला परिच्छेद वाचून काही प्रश्न सोडवायचे असतात. असे प्रश्न सोडवताना तर्कशुद्ध विचार करावा लागतो.

त्यानंतर दादाने आम्हाला भाषांबद्दलची अद्भूत माहिती दिली. भाषाकुलांबाबत वेगवेगळ्या सांस्कृतिक गमती-जमती सांगितल्या. जसे की पर्शियन संस्कृतीमध्ये देवाला 'अहुरा' आणि राक्षसांना 'दैव' म्हणतात, तर आपल्याकडे राक्षसांना 'असुर' आणि देवांना 'दैव' म्हणतात. अशाप्रकारे आमची *Linguistics* ऑलिंपियाडबाबतची चर्चा खूपच रंगली.

**• या दोनही ऑलिंपियाड्सचे स्वरूप काय?**

दरवर्षी भारतातून नववी ते बारावी या वयोगटातील *Linguistics* साठी आठ जण तर *फिलॉसॉफीसाठी* दोन जण निवडले जातात. यावर्षी *फिलॉसॉफीसाठी* मी आणि

*जो सर्व भूतांचा ठायी, द्वेषातें नेणेंचि काही। आपपरू नाहीं, चैतन्या जैसा।।*

**अधिक माहिती मिळवा...** सर्वात जास्त उंचीवरील सरोवर - देवताल सरोवर - गढवाल, उत्तराखंड

**प्रायोजक - चि. अखिलेश संतोष काकडे, पुणे**

प्रबोधिनीतील निहार कुलकर्णी निवडले गेलो. त्यानंतर *Microsoft* तर्फे *training camps* आयोजित केले जातात. त्यातील तयारीसाठी सर्वात महत्त्वाची असते गटचर्चा. चर्चेतूनच सर्वांची मते कळतात. त्यामुळे तो विषय जास्त पक्का होतो.

**• तुला ऑलिंपियाडमुळे काय फायदा झाला?**

मी ऑलिंपियाडमधून 'आपलं मत शेवटी बनवा' ही *फिलॉसॉफी* शिकलो. मला प्रशिक्षणातून बरंच काही शिकायला मिळालं. अजून एक वेगळी गोष्ट म्हणजे माझी वेगवेगळ्या देशातल्या मुलांशी छान मैत्री झाली. विचारांची देवाणघेवाण झाली. वेगवेगळ्या विषयांवरील चर्चेतून वेगवेगळे विचार समजून घेता आले. मला ऑलिंपियाडमुळे खूप काही शिकायला मिळालं.

आम्हाला वैयक्तिक परीक्षेसोबतच *Linguistics* मध्ये गटकार्ये देखील असतात. या गटकार्यांचा फायदा मला वैयक्तिक आयुष्यातही झाला. आमच्या गटात एक बल्गेरियाचा मुलगा होता. जेव्हा त्याला कळले की मला *Linguistics* ऑलिंपियाडसाठी बल्गेरियात जायचे आहे तेव्हा त्याने लगेच त्याच्या घरी राहण्याचे निमंत्रण दिले. आम्ही फक्त ५-६ दिवस एकत्र होतो. पण आमची मैत्री खूप जुनी असल्यासारखी घट्ट झाली.

*फिलॉसॉफी* ऑलिंपियाडचा माझ्या आयुष्यावर मोठा परिणाम झाला. त्यातून मी एक खूप महत्त्वाची गोष्ट शिकलो, ती म्हणजे आयुष्यात *confusion* असणं खूप महत्त्वाचं असतं. *confusion* नसेल तर निर्णय घेणं अवघड जातं. म्हणजे मला एखादा निर्णय घ्यायचा असेल तर त्या गोष्टीबाबत विविध अंगांनी विचार करून मला प्रश्न पडले पाहिजेत, तरच मी योग्य उत्तर शोधू शकतो. म्हणजे कुठल्याही बाबतीत स्वत:चं मत शेवटी बनवावं. एखाद्या प्रश्नाकडे पूर्वग्रहदूषित दृष्टिकोनातून बघितलं तर योग्य निर्णय कधीच घेता येत नाही. सर्व बाजूंनी विचार केला पाहिजे म्हणूनच confusion महत्त्वाचं असतं.

**• तू पुढे कशात करिअर करणार आहेस? तसेच तुझे छंद काय काय आहेत?**

मला *cognitive science* मध्ये रूची आहे. *Cognitive Science* अंतर्गत आपला मेंदू कसा काम



करतो? *Intelligence* म्हणजे काय? *Replica* त *conciousness* असेल का? किंवा साधारणपणे आपण म्हणतो की मी मराठीत विचार करतो किंवा इंग्रजीत विचार करतो. मग जो माणूस अशिक्षित आहे तो विचारच करत नाही का? मग आपल्या विचारांची भाषा कोणती असेल? इत्यादी... अशा प्रश्नांची उत्तरे शोधायची असतात.

छंद म्हणायचे झाले तर मला पक्षी निरीक्षण करायला आवडतं. मला नाणी जमवण्याचाही छंद आहे. मी त्यावर इ. पाचवीत संग्रहात्मक प्रकल्पही केला होता. माझ्याकडे ११० देशांची नाणी आहेत. मी गेली अकरा वर्षं नाण्याचा संग्रह करतो आहे.

हळूहळू दादानं उल्लेख केलेल्या अनेक प्रश्नांवर आमचा विचार सुरू झाला. भविष्यात डॉक्टर, इंजिनियर होण्याच्या स्वप्नांखेरीजची संशोधनाची ही वेगळी वाट आम्हाला दादानं दाखवली. तुम्हालाही अशा वेगळ्या विषयाच्या ऑलिंपियाडबद्दल कुतूहल वाटत असेल. त्याच्याशी झालेल्या गप्पा या आपल्या सर्वांसाठी खूपच प्रेरणादायी ठरतील. आणि आपल्या सर्वांचंच या विषयावरील शंकांचं निरसन करतील.

✧✧

**- चि. अभिषेक देढे**
adedhe@gmail.com

**शब्दांकन :** कु. रोहिणी, कु. अनन्या,
कु. पर्णवी, कु. सई
- सर्व इयत्ता ९ वी, ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे ३०




*रूप पाहतां लोचनी। सुख जालें वो साजणी। तो हा विठ्ठल बरवा, तो हा माधव बरवा।।*

**अधिक माहिती मिळवा...** सर्वात मोठा कालवा - इंदिरा गांधी किंवा राजस्थान कालवा, राजस्थान



**प्रायोजक - सौ. नंदिता सदाशिव वझे, पुणे**

# सोडवा हे शब्दकोडे



**आडवे शब्द**

१. त्वचेतून बाहेर पडणारे द्रव्य
३. सिंहगड
४. सख्य, कुठल्याही वयात दोन व्यक्तींमध्ये होते ती.
६. पुलाचे नाव, एक्सप्रेसचे नाव
७. मुलगा
८. या आजारात डोळे पिवळे पडतात.
९. वस्तूचा चौथा भाग
१०. गोष्ट, मुद्दा
११. सर्वात वेगवान गोष्ट
१३. पंकज, भुंग्याचे आवडते पुष्प
१४. शिरस्त्राण
१६. याचे लाडू व शिरा करतात
१७. मध्ये मध्ये --- खुपसू नये
१८. ही सहज होत नाही, मोकळीक
२०. परिस्थितीचे ---- असावे
२२. मृदू
२३. जल
२४. शुकपक्षी
२६. कृष्णपिंगाक्ष, गणपती स्तोत्रातील गणपतीचे बारावे नाव
२७. लज्जा, शरम
२८. नवरा मुलगा

**उभे शब्द**

२. त्रिनेत्रधारी
३. कचरा, घाण
७. मूर्तीचे विशेषण
८. भिंतींनाही असतात
११. घाण, धूळ
१२. अनाथ
१४. कडा
१५. बाबांची आई, ही आपल्या आईची-- असते
१७. पंजाबी पोळीचा प्रकार
१९. प्रती, शेकडा
२०. भाऊबीजेला बहिण ज्याला ओवाळते तो
२१. सभोवताल, आसपास
२४. जंगल, अरण्य

**– चि. आदित्य आसबे**
ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय,
निगडी, पुणे 411044

(उत्तरे अन्यत्र)

*हेचि दान देगा देवा, तुझा विसर न व्हावा। गुण गाईन आवडी, हेचि माझी सर्व जोडी।।*

**अधिक माहिती मिळवा...** सर्वात जास्त पाऊस पडणारे ठिकाण – मौसिनराम, खासीहिल्स् मेघालय

**प्रायोजक - श्री. राहुल भिडे, पुणे**

# देखणे कुरल

– कु. तेजल मेखे



**आपण अनेक पक्षी बघतो; पण आकाशात उडणाऱ्या कुरल पक्ष्यांच्या ओळी पाहाणे हे दृश्य खचितच मनोहारी असतं! चला तर कुरलबद्दल अधिक माहिती मिळवूया.**

---

**वर्णन :** पाण्याच्या कडेने वावरणाऱ्या कुरलांना चटकन ओळखण्याची खूण म्हणजे त्यांची लांब व टोकाला किंचित बाकदार झालेली चोच होय. तो पक्षी अगदी तोंडात सनई धरल्यासारखा दिसतो. कुरलची पाठ तांबूस रंगाची असते. त्यावर काळ्या रेषा असतात व पोटाचा रंग अधिक पांढरा असतो. पाय उंच आणि अधिक काळसर असतात. शेपटीची पिसे आतून गडद तांबूस तर बाहेरून राखी-तांबडी दिसतात. शेपटाच्या भुंड्या पिसावर आडव्या राखी पट्ट्या असतात. नर व मादी हे सारखेच दिसतात.

**विणीचा हंगाम व पिल्ले :** कुरल या पक्ष्यांचा त्यांच्या मूळ स्थानी मार्च - एप्रिलमध्ये जोडा जमतो. नराचे चित्तथरारक गाणे आणि हवेतून पंख पसरून विमानासारखे अलगद जमिनीवर उतरण्याचा प्रेक्षणीय खेळ मादीच्या मनाला प्रफुल्लित करणारा आणि फुलविणारा असतो.

**जातभाई:** कुरल, लाँग बिल्ड कुरल, एस्किमो कुरल, मादागास्कर कुरल, ब्रिसला थाईड कुरल व कर्ल्यु

**स्थलांतर :** काही कुरल पश्चिम सैबेरियात घरटी करून अंडी घालतात. युरोप हे कुरल पक्ष्याचे मूळ स्थान आहे. सप्टेंबर महिन्यापासून 'कुरल'चे थवेच्या थवे स्थलांतर करून भारतात यायला लागतात. मे महिन्यात ते परत जातात.

कुरलचा मोठा भाऊ शोभावा असा कुरल अमेरिकेत आढळतो. त्याचे नाव 'लाँग बिल्ड कुरल' असे आहे. त्याच्याहून थोडा लहान असणारा कुरल पूर्व सैबेरियाचा निवासी आहे. तो हिवाळ्यात दक्षिण मलायात आणि ऑस्ट्रेलियात दिसतो. 'ब्रिसला थाईड कुरल' हा त्याचा भाऊबंद मध्य पॅसिफिक बेटावर हिवाळ्यात स्थलांतर करून वस्तीला येतो.

नेपाळमधील ग्लोझियर्स या ५८०० मी. उंचीवरच्या ठिकाणीही हे पक्षी स्थलांतर करून येताना आढळून आलेले आहेत.

**स्थान :** भारतातील सर्व समुद्रकिनाऱ्यांवर हा पक्षी आढळतो. आपल्या खानदेशातही तो तलावाच्या काठाशी दिसतो.

उत्तरेकडून स्थलांतर करताना कुरल सुरुवातीला कोरड्या भूप्रदेशात आश्रय घेतात. आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावरही ते पक्षी स्थलांतर करतात. मादागास्कर कुरल हा हिवाळ्यात दक्षिण मलायात आणि ऑस्ट्रेलियात दिसतो.

**संख्या :** कुरलांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. त्यांच्या रुचकर मांसाच्या काल्पनिक कथेने त्यांची हत्या मोठ्या प्रमाणावर होत चालली आहे. कुरलांची बाजारातील मागणी वाढली असल्याने शिकारी त्यांची हत्या करतात. अशाच बेसुमार हत्येमुळे 'एस्किमो कुरल' हा त्याचा जातभाई आता जवळजवळ नष्ट होण्याच्या मार्गाला लागला आहे. अलीकडेच त्याच्या संरक्षणाचा कायदा झाला आहे. अटलांटिक किनाऱ्यावर त्यांची मोठ्या प्रमाणावर हत्या केली आहे.

**आयुमर्यादा :** युरोपियन कुरल हे दीर्घायुषी असतात. कुरल सगळ्यात जास्त म्हणजे ३२ वर्षे जगल्याची नोंद आहे.



*उदार तुं हरी, ऐसी कीर्ति चराचरीं। अनंत हे थोरी, गर्जताती पवाडे।।*

**अधिक माहिती मिळवा...** सर्वात मोठा रेल्वे मार्ग - आसाम ते कन्याकुमारी

**प्रायोजक - प्रतिभा इलेक्ट्रिकल्स, पुणे**





मादीदेखील अतिशय हळुवार आवाजात शीळ घालून प्रतिसाद देत असते.

जून आणि जुलैमध्ये मादी कपाच्या आकाराचे घरटे बांधून चार अंडी घालते. अंड्यांचा रंग हिरवट असतो. कधीकधी ती अंडी दगडासारखी अथवा भुरकट तांबूसही दिसतात. त्यावर तांबडे ठिपके असतात. नरमादी दोघेही कधी कधी पावसाचा त्रास होऊ नये म्हणून मिळून घरट्यात दाटीवाटीने बसून अंड्यावर आच्छादन करताना दिसतात. अंड्याबाहेर पडलेले पिल्लू त्वरितच पळापळ करू लागते. अन्नाचा शोध घेते. कुरलच्या पिल्लांची चोच सुरुवातीला सरळ असते. नंतर ती हळूहळू वक्र होते. तिसऱ्याच दिवशी स्वावलंबी होऊन ते पिल्लू स्वत:चं संरक्षण करायला शिकते.

**कुरलचे अन्न :** कुरलांचे मुख्य अन्न म्हणजे छोटी फळे, बिया, किडे असे असते. नेहमीचे त्यांचे राहाण्याचे ठिकाण समुद्र किनाऱ्याचा प्रदेश असले तरी दलदलीचे त्यांना जास्त आकर्षण असते. ते आपली लांबट चोच दलदलीतल्या चिखलात घालून नाना प्रकारचे, बिनकण्याचे गिळगिळीत कीटक शोधून त्यांचा फज्जा पाडतात.



हिवाळ्यात कुरलांची झुंड आपली लांब आणि किंचित बाकदार चोच खुपसून तळ्याकाठी चिखलात अन्न शोधताना, पुढे जाताना पाहावे. तेव्हा त्यांची मान बुडाल्यासारखी वाटते. ते आपल्या लांबलचक चोचीचा उपयोग बिळातील किडे खाण्यासाठी करतात. समुद्राच्या लाटांमुळे किनाऱ्यावर ढकलले जाणारे कीटक हे त्यांचे आवडते अन्न आहे. समुद्रकाठच्या ओल्या जमिनीवरच्या भोकांमध्ये बसलेले खेकडे तो आपल्या लांबलचक चोचीच्या साहाय्याने शोधून काढतो व खातो. त्याला छोटे बेडूक, मासे आणि पाण्यातील कीटक आवडतात.

**इतर माहिती :** पाणपक्षी बऱ्याच वेळा एकसारखे दिसतात. बगळे, शेकाट्या, टिटव्या यांच्या गर्दीत कुरल उभा राहिला तर लगेच लक्षात येत नाही. कुरलची चोच मात्र तो तिथे असल्याची खात्री पटवते. आकाराने थोडा लहान असलेला कुरल हा 'मादागास्कर' या नावाने ओळखला जातो. परंतु मादागास्कर नाव असलेला हा कुरल मादागास्कर या देशात मात्र कधीच आढळत नाही. त्याला मादागास्कर हे नाव कसे पडले हे एक कोडंच आहे. कुरलसारखेच दिसणारे 'गॉडविट्स' कुरलचे नातेवाईक असले तरी त्यांची चोच मात्र सरळसोट असते.

सूर्यास्ताच्या वेळी विटर, विटर करीत व्ही आकारात गटाने निघालेल्या कुरल पक्ष्यांची माळ आकाशात विलोभनीय दिसते.

✧✧

**– कु. तेजल मेखे** (इ. ८ वी)
तात्यासाहेब सामंत विद्यालय,
चाळीसगाव



*दोन्ही हात ठेवुनि कटीं, उभा भींवरेच्या तटीं। कष्टलासी साठीं। भक्तिकाजें विठ्ठला।।*



**अधिक माहिती मिळवा...** सर्वात जास्त उंचीवरील रेल्वे स्टेशन – घूम, पं. बंगाल

**प्रायोजक – कु. स्पृहा विजय कुलकर्णी, पुणे**

# मुक्त चिंतन

**मित्रांनो, एखादी कृती, एखादं गाणं, एखादं चित्र आपण पाहातो, अनुभवतो आणि नकळत आपल्या मनात त्याबाबत एखाद्या विशिष्ट दिशेनं विचार सुरू होतो. सोबतच्या लेखातून आपल्या मैत्रिणीला वाळलेलं पान दिसल्यावर काय वाटलं? दुसऱ्या एका मैत्रिणीला स्वच्छतेचा प्रकल्प करताना काय जाणवलं? तर एखादं गाणं ऐकल्यावर कोणत्या विचारांचे तरंग आपल्या तिसऱ्या मैत्रिणीच्या मनात उमटले हे वाचूया मुक्त चिंतनात...**


## वाळक्या पानाचं चित्र

**– कु. सई कामत**

वरवर बघितलं, तर वाळलेल्या पानाचं चित्र आपल्याला फार काही सांगून जात नाही. शेवटी तेही एक चित्रच आहे; तेसुद्धा रंगीबेरंगी नाहीतर पांढरं काळं! ते तर आपल्याला काहीच सांगू शकत नाही. वाळक्या पानाच्या चित्राला (शेडिंगशिवाय) पेन्सिलीनं दिलेल्या रंगाशिवाय त्याला कुठल्याच रंगानं मढवलेलं नसतं. मढवलेलं कुठलं, फक्त पानाचा छाप घेताना पान दिसावं म्हणून तो रंग नुसताच फासलेला असतो. तो फासलेला रंग तरी काय हो सांगणार आपल्याला? मग या वाळक्या पानाच्या चित्राला मी इतकं महत्त्व का देत आहे? जर त्या चित्रात काहीच सांगण्यासारखं नसेल तर त्याकडे बघून मी एवढी अस्वस्थ का आहे? विचार केल्यावर बरंच काही उलगडत जातंय मला.

ते एक वाळकं पान आपल्याला नेहमीच खूप काही सांगत असतं. पण आपण नेहमी त्याच्याकडे दुर्लक्षच करतो. आपल्याला तो अर्थ उमगतो जेव्हा आपण त्याच्याकडे बोलक्या नजरेनं पाहतो. आणि एकदा ती नजर पानावर पडली, की ते वाळक्या पानाचं चित्र आपल्याला खूप काही देऊन जातं...

ते जमिनीवर पडलेलं असताना माणसाच्या पायाखाली चिरडलं जातं. पण करतं फक्त 'कुरकुर.' जणू काही ते विनंती करत असतं, 'थांबा. माझं जरा ऐका. मी खरंतर तुमच्यासारखाच! एक सामान्य! कितीही चिरडला गेलो, भरडला गेलो तरी फक्त कुरकुरच करणारा. कधी 'एकत्र येऊन आवाज उठवावा' असं तुम्हाला वाटत नाही. तसाच आवाज कधी मीही उठवत नाही. फक्त मी विनंती करू शकतो.'



कधी कधी ते एक वाळक्या पानाचं चित्र मला दाखवतं माणसाच्या विचारांची गुंतागुंत! शेवटी सगळ्या विचारांची सांगड घालून त्याचा बनतो एक मुख्य विचार. विचारांतून निर्माण होतो संकल्प. तोच संकल्प माणसाला पुढे घेऊन जातो. ते पान जणू काही आपल्याला सांगत असतं. 'माझ्या सगळ्या शिरा एकत्र येऊन माझ्या मुख्य शिरेला मिळतात. आणि अन्न पुरवतात. आणि म्हणूनच मी नेहमी हिरवा राहतो.'

ते एक वाळक्या पानाचं चित्र दाखवतं एक समाज, एक देश. वेगवेगळी राज्य, वेगवेगळे धर्म, वेगवेगळे लोक. ते एकत्र आले तर समाज बनतो. मग त्या समाजाची बनते चळवळ. त्या चळवळीतून घडते क्रांती. याचं उदाहरण आपल्यासमोर आहेच. ते म्हणजे आपला स्वातंत्र्य लढा. तेव्हा सर्व प्रकारचे लोक एकत्र आले आणि आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. पान आपल्याला सांगत असतं, 'माझं पण असंच आहे. देठाद्वारे मी झाडाला जोडला जातो. पण... पण... एकदा माझ्या राज्यांमध्ये फूट पडली. शिरांनी काम थांबवलं. मी हळूहळू पिवळा पडायला लागलो आणि शेवटी निर्जीव होऊन जमिनीवर



*जे कां रंजले गांजले, त्यांसि म्हणे जो आपुले। तोचि साधु ओळखावा, देव तेथेंचि जाणावा।।*



**अधिक माहिती मिळवा...** सर्वात मोठा रेल्वे फलाट – खरगपूर, प. बंगाल

**प्रायोजक - सौ. मंजुषा सावर्डेकर, पुणे**

पडतो. आणि आता माझ्या नशिबात फक्त भरडलं जाणंच आहे.


म्हणूनच सांगतो, मी जी चूक केली ती तुम्ही करू नका. मी एकदा चूक केली आणि ती सुधारण्यासाठी मला पुन्हा संधी मिळाली नाही; पण तुम्ही 'माणसं आहात माणसं.' तुमच्यासाठी संधी येतच असतात. तर त्या संधी गमावू नका. जर गमवल्यात तर तुमची हालत माझ्यासारखी होईल.'

एक वाळक्या पानाचं चित्र आपल्याला इतकं काही सांगत असेल, तर हा निसर्ग आपल्याला किती सांगत असेल? त्याचं सांगणं आपल्याला कधी कळणार?

✧✧

– **कु. सई कामत** (इ. ८ वी), ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

**चित्रकार–** कु. मैथिली फाटक




प्रिय मित्र मैत्रिणींनो,

आम्ही शाळेत नुकताच स्वच्छतेवर आधारित प्रकल्प केला अन् त्या निमित्ताने मला माझी स्वच्छतेविषयीची जबाबदारी समजली. तुमच्या सर्वांशी हे *शेअर* करावं असं मनापासून वाटलं. म्हणून हे पत्राचं माध्यम निवडलं.

मला तुम्हाला एक प्रश्न विचारायचा आहे, तुम्हाला कोठे राहायला आवडेल? स्वच्छ, आरोग्यपूर्ण परिसरात की आरोग्याचा अभाव असलेल्या भकास परिसरात? अर्थात, तुम्ही सर्वजण स्वच्छ परिसराची निवड कराल; पण तुम्ही कधी स्वत:हून आपला परिसर स्वच्छ, निर्मळ करण्याचा विचार केला आहे का? स्वच्छतेकडे हवे तितके लक्ष आपण पुरवतो का? काही निवडक माणसेच आपला परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी महत्त्वाची पावले उचलताना दिसतात. या पत्राद्वारे मी तुम्हाला आपला परिसर, कॉलनी, संपूर्ण पर्यावरण स्वच्छ ठेवण्यासाठी काही कल्पना सुचवू इच्छिते.

स्वच्छता आपल्या आरोग्यासाठी महत्त्वाची आहे. म्हणूनच उद्याचे भावी, जबाबदार नागरिक या नात्याने तुम्ही खालील चतु:सूत्रीचा वापर केला पाहिजे.

**१. कमी वापर :** प्रत्येक वस्तूचा गरजेपुरता वापर करणे, (वस्तू) वाया न घालवणे. **२. पूर्ण वापर :** एखादी वस्तू किंवा उत्पादन जास्तीत जास्त वेळा, पूर्णपणे वापरणे. **३. पुनर्वापर :** कचऱ्यापासून, टाकाऊ पदार्थांपासून उपयुक्त वस्तू बनवणे. **४. पूर्ण नकार :** एखादी गोष्ट अगदीच अनावश्यक असेल तर ती पूर्णपणे टाळणे.

आपण या चतु:सुत्रीचा वापर करून आपल्या भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या 'स्वच्छ भारत' अभियानात योगदान दिले पाहिजे.

मला माहीत आहे, आपल्यापैकी काहीजण नेहमी वेफर्सची प्लॅस्टिक वेष्टने, चॉकलेटचे कागद, शाळेच्या मैदानावर किंवा रस्त्यावर निष्काळजीपणे फेकून देत असतील. पण याचे असंख्य दुष्परिणाम होतात. उदा. गटारे तुंबतात आणि स्वच्छ पाण्याचे स्रोतही दूषित होतात. तसेच रस्त्यावरील मोकाट कुत्री किंवा गाईंनी ही वेष्टने खाल्ली तर त्यांच्या पचनसंस्थेच्या कार्यात बिघाड होऊन ती दगावतात.

म्हणून आपण सर्वांनी प्लॅस्टिकच्या पिशव्या, बाटल्या, खेळणी इ.चा वापर जाणीवपूर्वक टाळला पाहिजे. जलप्रदूषण, वायूप्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी आपले कुटुंब, मित्र, नातेवाईक, शेजाऱ्यांमध्ये जागृती घडवून आणली पाहिजे. कारण स्वच्छता ही अशी खिडकी आहे ज्यातून प्रगतीचा बंदिस्त पक्षी खुल्या आकाशात उंच उडी मारण्यासाठी धडपडत असतो. त्याला उडू द्या, तुमच्या कृतीतून, तुमच्या आचरणातून!

धन्यवाद!

तुमची मैत्रीण

तन्वी

✧✧

– **कु. तन्वी बोरा** (इ. ७ वी)

ध्रुव अॅकेडमी, धांदरफळ, ता. संगमनेर



*मजवरी दया करा, ताटी उघडा ज्ञानेश्वरा। संत जेणें व्हावें, जगबोलणें सोसावें।।*

**अधिक माहिती मिळवा...** सर्वात जास्त उंचीवरील रस्ता – खारदुंगला पास, लेह मनाली विभाग

**प्रायोजक - श्री. अजित भिडे (डायरेक्टर, अॅसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा.लि. २५३८०४०६), पुणे**

# गोष्ट जीवनाची

एक कंटाळवाणी दुपार... अर्ध्या तासापासून बस स्टॉपवर उभी होते... गर्दीनं खचाखच भरलेली का असेना पण आली एकदाची बस! या आनंदात बसमध्ये चढले. बसच्या गर्दीतून पुढं घुसत-घुसत जात होते... कशी तरी उभी राहण्यापुरती जागा मिळवली... शेजारी उभ्या असलेल्या काकांच्या फोनमधून रफींच्या आवाजातलं सुंदर गाणं ऐकू आलं -

*फुलों से दोस्ती है, काँटोसे यारी है*
*ऐसे मजे की प्यारे, जिंदगी हमारी है।।*

वाटलं - खरंच, असंच जगायला हवं आयुष्य! एखादी गोष्ट मनासारखी झाली नाही, तर कधी कधी आयुष्यात निराश वाटायला लागतं. पण नावीन्याची सुरुवात मनातूनच होते. म्हणून मनाचा उत्साह टिकवणं महत्त्वाचं ठरतं...

सरत्या वर्षात घडलेल्या काही घटनांनी मनाला अस्वस्थ केलं! मी फार अस्वस्थ होते, जेव्हा दहा वर्षांचा चिमुकला आपला छोटासा हट्ट पूर्ण झाला नाही म्हणूनच स्वत:चं जीवन संपवतो... जेव्हा १९ वर्षांचा एक तरुण प्रेमभंगाच्या दु:खात *व्हॉटसअ‍ॅपवर* स्वत:ला भावपूर्ण श्रद्धांजली वाहून स्वेच्छेनं जगाचा निरोप घेतो... खेळण्या - बागडण्याच्या निरागस बालपणात, ध्येयांचा ध्यास घेण्याच्या तारुण्यात एवढं टोकाचं पाऊल उचलण्याएवढी नकारात्मकता येते तरी कुठून...? चोवीस तास एकमेकांशी *कनेक्टेड* राहण्याच्या या युगातही आपण अशा खचलेल्या मनांना ओळखू शकत नाही? संपूर्ण जगात काय सुरू आहे, यांचे सतत *अपडेट्स* ठेवणारे आपण आपल्यासोबत वावरणाऱ्या एखाद्या व्यक्तीच्या मनातलं वादळ वाचू शकत नाही? आभासी जगाचं (*व्हर्च्युअल* जीवनाचं) व्यसन लागून आपल्या संवेदना बोथट होत आहेत. 'माझं दु:ख कोणीच समजू शकत नाही,' या भावनेनं पोखरलेल्या जिवांशी जवळच्या लोकांनी योग्यवेळी संवाद साधला असता तर कदाचित त्यांचा जीव वाचू शकला असता...!

माझे आजोबा नेहमी म्हणतात की, 'आजच्या पिढीला थांबण्याची सवयच राहिली नाही... तुम्ही एखाद्या गोष्टीची मागणी करायचा अवकाश... की, ती वस्तू हजर हवी असते तुम्हाला... आमच्या वेळी असं नव्हतं... गोष्टी सहजासहजी न मिळाल्यामुळं आमच्यात *'पेशन्स'* आणि त्या गोष्टीचं महत्त्व या दोन्हीची जाणीव असायची...'

त्यांच्या या म्हणण्यावर एकदा मी खरंच विचार करू लागले... आणि जाणवलं प्रत्येक गोष्ट *इन्स्टंटली* हवी असणं आणि तसं न झाल्यास निराश होऊन प्रयत्न सोडून देणं ही आमच्या सर्वांची वृत्ती बनत चालली आहे. मग तीच या दुर्घटनांचे कारण आहे का? असाही प्रश्न मला पडला.

प्रत्येकवेळी आपल्याला पहिल्याच प्रयत्नात यश मिळेल असं नाही. मनात घोंघावणाऱ्या निराशेच्या वादळाची चाहूल लागताच स्वत:च सावध व्हायला हवं. निराश करणारी एखादी गोष्ट किंवा व्यक्ती, एखादी वाईट घटना, एखादी हुकलेली संधी म्हणजे 'आयुष्य' नव्हेच... आयुष्याच्या पुस्तकात त्यांचं महत्त्व एखाद्या ओळीपुरतं, परिच्छेदापर्यंतच... फार तर काही पानापर्यंत... असं म्हणून पुढचं पान न उलटता पुस्तक बंद का करावं? आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे असं केल्यानं प्रश्न सुटतो का? कदाचित नवीन पानावर नवी संधी तुमची वाट पाहात असेल..

म्हणून नकारात्मक विचार आले की, ज्या गोष्टींनी सकारात्मक वाटेल ते करायचं मी ठरवलं आहे. एखाद्या जिवलग दोस्ताकडं मन मोकळं करावं... हवं तर मनसोक्त रडून घ्यावं... अन् सज्ज व्हावं पुढच्या प्रवासासाठी... नवीन वर्षात आभासी जगातून थोडंसं बाहेर येऊन खरंखुरं आयुष्य जगूया. मनामनातली दरी दूर करण्यासाठी संवादाचे पूल बांधूया... चला तर मनातली नकारात्मकतेची जळमटं काढून त्याला सकारात्मकतेने सजवूया... नव्या पर्वाच्या स्वागतासाठी...!

✧ ✧

**- कु. तृप्ती मोरे** (इ. ९ वी)
दादासाहेब नाटेकर गुरुकुल, चिखली, पुणे



*देह जावो अथवा राहो। पांडुरंगी दृढ राहो।।*



**अधिक माहिती मिळवा...** सर्वात मोठा रस्त्यावरील बोगदा - जवाहर टनेल, जम्मू काश्मिर

**प्रायोजक - सौ. रंजना सतीश कुलकर्णी, सातारा**



# पेट्रोल-डिझेलची झाडे?

साऱ्या जगालाच आता ऊर्जेची समस्या भेडसावीत आहे. कारण आपल्याला दैनंदिन जीवनात विविध प्रकारच्या ऊर्जेची गरज असते. इंधन, विद्युतऊर्जा, अणुऊर्जा, सौर ऊर्जा, दगडी कोळसा, लाकूड, पेट्रोल, डिझेल इ. स्वरूपात आपण ऊर्जा वापरत असतो. वाहनासाठी इंधन म्हणून प्रामुख्याने पेट्रोल, डिझेलचा वापर खूप मोठ्या प्रमाणात होत असतो. पेट्रोल, डिझेलचे साठे नजीकच्या भविष्यकाळात संपुष्टात येतील अशी भीती शास्त्रज्ञांनी वर्तविली आहे. परंतु जर हे इंधन संपलेच तर पर्यायी इंधन शोधून काढण्यात शास्त्रज्ञांना यश मिळत आहे. ते म्हणजे त्यांनी आता पेट्रोल, डिझेल हे इंधन देणारी झाडेच शोधून काढली आहेत. वनस्पतींपासून हे इंधन मिळते यावर सामान्य माणसाचा विश्वास बसत नाही. परंतु हे शास्त्रीय सत्य आहे.

काही जातींच्या वनस्पतींपासून पेट्रोल, डिझेल सारखेच इंधन मिळते. भूगर्भातील पेट्रोलमध्ये प्रामुख्याने हायड्रोकार्बन्स मिळतात; त्याप्रकारचे हायड्रोकार्बन्स देणाऱ्या वनस्पतींच्या जाती जगात अनेक ठिकाणी उपलब्ध आहेत. निर्जल, रुक्ष व वाळवंटी प्रदेशात वाढणाऱ्या निवडुंग, साबर, चंद्रिका, शेर इ. वनस्पतींपासून पेट्रोलसारखे इंधन शास्त्रज्ञांनी फार पूर्वीच मिळविले आहे. इफोरबियेशी या निवडुंगासारख्या व ज्यांच्यात दुधासारखा पांढरा द्रव असलेल्या, त्याच कुलातील वनस्पतींना 'पेट्रोवृक्ष' तथा 'पेट्रो क्रॉप्स' म्हणतात. ब्राझिलच्या जंगलात आढळणाऱ्या कोपी फेरा या वनस्पतीपासून मिळणारे द्रवरूप इंधन वाहनांना वापरता येते. वन एरंड तथा मोगली एरंड या वनस्पतीपासून पेट्रोल मिळविता येते. इतकेच काय पण ब्रोटी कोकस ब्राऊनी नावाच्या शैवालापासूनही हायड्रोकार्बन्स मिळतात.

वाळवंटी प्रदेशात आढळणाऱ्या या वनस्पतींमध्ये दुधासारखा पांढरा चिकट द्रव आढळतो त्या द्रवात तरल हायड्रोकार्बन्स असतात. विशिष्ट प्रक्रिया करून हे हायड्रोकार्बन्स अलग करता येतात आणि हे नैसर्गिक हायड्रोकार्बन्सप्रमाणे पेट्रोलसारखे काम करतात. भारतातदेखील अपारंपरिक ऊर्जा विभागातर्फे या संदर्भात मोठ्या प्रमाणात संशोधन चालू आहे. वाळवंटी प्रदेशात अशा पेट्रोल देणाऱ्या वनस्पतींची लागवड मोठ्या प्रमाणात केली जात असून ऊर्जा समस्येवर या प्रकल्पाद्वारे मात करता येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

(संकलित)

## पुणेरी पाट्या

- **रिक्षेवरची पाटी –** हे ईश्वरा, तू सर्वांचं भलं कर. परंतु सुरुवात माझ्यापासून कर.
- **देवळासमोर चप्पलस्टँडजवळची पाटी –** निराशा व पादत्राणे येथे काढावीत.
- **फोटोग्राफी दुकानासमोर –** फोटो खराब आल्यास वडिलांना जाब विचारावा, आम्हाला नाही.
- **दुकानासमोरची पाटी –** गिऱ्हाईक हा राजा असतो. राजा कधीही उधार मागत नाही.
- **इमारतीतील लिफ्टसमोर –** बाहेरच्या लोकांनी लिफ्ट वापरू नये. अडकल्यास सोसायटी जबाबदार नाही.



*नाचे तन नाचे मन। नाम घेता पांडुरंग।।*



**अधिक माहिती मिळवा...** सर्वात मोठा त्रिभुजप्रदेश – सुंदरबन, कोलकता

**प्रायोजक – डॉ. विनायक देसूरकर, पुणे**

# सिंधू संस्कृती... एक प्राचीन संस्कृती

– कु. अनन्या जोगळेकर

**भारताच्या इतिहासाबद्दल आपणा सर्वांनाच अभिमान असतो. हिंदुस्थानाची नाळ सिंधू नदीशी आणि पर्यायाने सिंधू संस्कृतीशी जोडलेली आहे. हिंदुस्थानाच्या इतिहासाचा महत्त्वाचा घटक असलेल्या या संस्कृतीबद्दल आज मात्र, आपल्याकडे अगदीच तुटपुंजी माहिती आहे. रहस्यमय सिंधू संस्कृतीच्या अद्भुत शोधाचा हा घेतलेला वेध...**

भारताचा उज्ज्वल इतिहास, संस्कृती, श्रेष्ठ तत्त्वज्ञान आपण मोठ्या अभिमानाने सांगतो. रामायणकाल व महाभारतकालात भारतात असलेल्या समृद्धीविषयीही आपल्या मनात अभिमान आणि आदर आहे. अखंड हिंदुस्थानाची शान असलेली ही प्राचीन, श्रेष्ठ हिंदू संस्कृती. पण खरोखरच हिंदुस्थानात फक्त हिंदू संस्कृतीच होती का?

मुघलांची आक्रमणं, नंतर त्यांनी केलेला मुस्लिम धर्माचा प्रसार, पुढे ब्रिटिशांचं आगमन व त्यामुळे आलेला ख्रिश्चन धर्म! हे भारताच्या इतिहासातील काही इतर धर्म आणि पर्यायाने संस्कृती. याखेरीज भारतात एक आगळीवेगळी संस्कृती अस्तित्वात होती. होय! हीच ती सिंधू संस्कृती– *Indus valley civilization!* ही संस्कृती जगातील अतिशय प्राचीन संस्कृतीपैकी एक मानली जाते. तिचा कालखंडही आपल्याला परिचितच आहे. ३००० वर्षांपूर्वी, म्हणजेच महाभारत कालातलीच ही गोष्ट. भौगोलिकदृष्ट्या हा सगळा भाग सिंधू म्हणजेच *Indus* नदीच्या खोऱ्यात म्हणजेच आजच्या पाकिस्तानमध्ये येतो. पूर्वी याच भागातून सरस्वती नावाची आणखी एक नदी वाहत असे. हळूहळू ती आटत गेली व आज ती अस्तित्वात नाही. ऋग्वेदात तर गंगेप्रमाणे या सरस्वती नदीचीही स्तोत्रे आहेत. तर अशा या सरस्वती नदीच्या आणि सिंधू नदीच्या तीरांवर ही संस्कृती वसलेली होती.

१९२० च्या दशकात या भागात रेल्वे लाईन टाकण्याचं काम सुरू होतं. तेव्हा अचानक या संस्कृतीतील एका गावाची *site* सापडली. नंतर या सगळ्या प्रदेशात खूप उत्खनन करून अभ्यास केला गेला.

हडप्पा आणि मोहेंजोदडो ही या संस्कृतीतील दोन मोठी व महत्त्वाची शहरं. मात्र प्राचीन भारतातील इतर शहरांपेक्षा त्यांची ठेवण, शैली खूपच वेगळी आहे. त्यांची मूळ नाव अजून तरी कळलेली नाहीत. मुळात या संस्कृतीत वापरली जाणारी भाषाच अजून कळू शकलेली नाही.

त्यामागचं कारण असं, की येथील बऱ्याच *sites* वर काही शिलालेख *(inscriptions)* सापडले आहेत. मात्र, त्यावर जे काही कोरलं आहे, त्यात वापरलेली लिपी पूर्णपणे अपरिचित आहे. तिचा अर्थ अजूनतरी कोणीच लावू शकलेलं नाही. ही लिपी देवनागरीपेक्षा पूर्णपणे वेगळी भासते व अप्रगत लेखनशैलीतली आहे. त्यामध्ये मुख्यत: चित्रांचा व आकृत्यांचा वापर केलेला आहे. मात्र अशी लिपी जगात इतरत्र कुठेच सापडली नसल्यामुळे तिचा अर्थ लावणे खूपच कठीण आहे.

या काळात भारतात संस्कृत भाषा बोलली जात असे. त्यामुळे इतिहास संशोधक ज्ञानेश्वर कुलकर्णींसारख्या काही तज्ज्ञांचे असे मत आहे, की सिंधू संस्कृतीतही संस्कृतच बोलली जात असावी. इतकंच नाही, तर ते







**अधिक माहिती मिळवा...** सर्वात मोठे राज्य – राजस्थान

**प्रायोजक – श्री. निनाद रामचंद्र कात्रे, डोंबिवली**



असंही म्हणतात, की देवनागरी लिपी ही या सिंधू लिपीतूनच उत्क्रांत झाली असणार. पण याचा शास्त्रशुद्ध पुरावा आजतागायत मिळालेला नाही.

सिंधू नदीच्या खोऱ्यातली शहरं, वास्तू, भांडी ही सर्वच एका वेगळ्या शैलीची आहेत. हडप्पा, मोहेंजोदडोसारख्या प्रमुख शहरांमध्ये *Citadel* आणि *Lower town* असे दोन भाग आहेत. *Citadel* भागात राजाचा राजवाडा व इतर वास्तू आढळतात, तर *Lower town* मध्ये इतर नागरिकांचं वास्तव्य असे.

सिंधू संस्कृतीमध्ये सापडलेल्या शहरांमध्ये काही वैशिष्ट्य आहेत. एक म्हणजे या शहरातील रस्ते उत्तम प्रतीचे व एकमेकांना काटकोनी रचनेत आहेत. या रस्त्यांशी जोडलेली सांडपाण्याची व्यवस्था तर विशेष वैशिष्ट्यपूर्ण आहे. प्रत्येक वास्तूतील सांडपाणी रस्त्यांच्या कडेला असणाऱ्या छोट्या-छोट्या *channels* मधून शहरांपासून दूर नेण्याची उत्तम व्यवस्था इथे होती. प्रत्येक महत्त्वाचं शहर तटबंदीसारख्या एका प्रचंड भिंतीने वेढलेलं असे. ही भिंत १५ ते २० फूट उंच असे. काळाच्या ओघात जसजशी आक्रमणं वाढत गेली, तसतशी या भिंतीची उंची वाढवल्याचं आढळतं.

या शहरांमध्ये घरांच्या बांधणीत आणि एकूण शहरांच्या रचनेत कमालीची शिस्त व नियोजन दिसून येतं. शहरांच्या उभारणी व व्यवस्थेतून सिंधु संस्कृतीतील लोकांचं नगररचना शास्त्र अतिशय प्रगत व वाखाणण्याजोगं होतं, हे अधोरेखित होतं.

इथे सापडलेल्या काही वास्तू विशेष गाजल्या. त्यातील एक म्हणजे मोहेंजोदडोतील *'Great Bath'* हा राजघराण्यातील व्यक्तींच्या स्नानासाठी बांधलेला तलाव आजही जसाच्या तसा आहे. येथील वास्तूंची रचना खास *interlocking* पद्धतीने केली असल्यामुळे त्या वास्तू आजही जशाच्या तशा टिकून आहेत. अशी वास्तूंची रचना जगात इतरत्र फारशी कुठेच आढळत नाही.

विशेष म्हणजे सिंधू प्रदेशातील कोणत्याच उत्खननात एकही देऊळ सापडलेले नाही. पण दुसरीकडे काही उत्खननांत बरीच शिवलिंगं सापडली आहेत. हे काहीसं बुचकळ्यात टाकणारं आहे. याच प्रदेशातून भारतावर सतत आक्रमणं झाली आहेत, अगदी मुघलांच्याही आधीपासून. त्यामुळे इथली देवळं त्यांनी नेस्तनाबूद केली असण्याची दाट शक्यता आहे.

इतिहास संशोधकांच्या मते इथे सापडलेली शिवलिंगं हिंदू संस्कृतीचं अस्तित्व दर्शवतात. ज्याअर्थी इथे शिवलिंगं होती, त्याअर्थी इथले लोक शंकराची पूजा करीत होते.

त्याहूनही आश्चर्यकारक गोष्ट ही रामायण व महाभारत या ग्रंथांच्या आधारे ते या प्रदेशातील राज्य व त्यांची मूळ नावं निश्चित करतात. रामायणात रामाच्या सावत्र माता होत्या सुमित्रा व कैकेयी. त्यापैकी कैकेयीचं माहेर होतं केकयदेश. हा केकयदेश कुठे होता? तर रामायणातील उल्लेखांप्रमाणे तो या सिंधु नदीच्या आसपासच्या प्रदेशातच होता असे सिद्ध होते.


नगररचना



*पंढरीचा वास चंद्रभागे स्नान। आणिक दर्शन विठोबाचे।।*

**अधिक माहिती मिळवा...** सर्वात जास्त लोकसंख्येचे शहर – मुंबई

**प्रायोजक - डॉ. प्रियदर्शी सावंत, बोरीवली**


महाभारतात तर खूप व्यक्तिरेखा या भूप्रदेशाशी संबंधित आढळतात. कौरवांची माता गांधारी. तिचं माहेर–गांधारदेश. पांडवांपैकी नकुल व सहदेवांची माता व इतर तिघांची सावत्र माता माद्री. तिचं माहेर–मद्रदेश. जयद्रथ राजा– ज्याला सूर्यास्ताच्या आत मारण्याची अट अर्जुनाने कृष्णाच्या साहाय्याने पुरी केली होती–त्याचा सिंधूदेश. द्रौपदीचं माहेर–पांचालदेश. हे सगळे देश महाभारत या ग्रंथाप्रमाणे सिंधू संस्कृतीच्या प्रदेशातच होते. परंतु दुर्दैवाने हे समाधानकारकपणे सिद्ध होऊ शकलेलं नाही.

महाभारताचं युद्ध झाल्यानंतर काही वर्षांतच ही संस्कृती अचानकपणे अस्ताला गेली. आज तिचा लवलेशही कुठे सापडत नाही. उलट महाभारत काळात दिसत असलेली हिंदू संस्कृती मात्र आजही मोठ्या प्रमाणावर टिकून आहे. मग महाभारताच्या युद्धात झालेली प्रचंड मनुष्यहानी हे या संस्कृतीच्या नाशामागचं एकमेव कारण असेल का? मोहेंजोदडो, लोथल ही जरी आजच्या काळातली नावं असली, तरी त्यांचा प्रादेशिक भाषेतील अर्थ 'मृतदेहांचा ढीग' (mound of the dead) असा होतो. महाभारतकाळात संपूर्णपणे संपन्न असलेली ही संस्कृती अचानक कशी काय नाश पावली असावी? अजून बऱ्याच प्रश्नांची उत्तरं मिळायची आहेत. पण म्हणून हा विषय इथेच संपत नाही. सिंधू संस्कृतीबद्दलच्या रहस्याची उकल झाल्यास इतिहास संशोधनाला नवी दिशा मिळेल, हे नक्की.

भारतीय उपखंडाच्या इतिहासाचा अविभाज्य भाग असलेली अशी ही संस्कृती. 'आसिन्धूसिन्धूपर्यन्तम्' पसरलेल्या भारतवर्षाच्या इतिहासाला ती अधिकच उज्ज्वल करेल, असा विश्वास अनेक इतिहास संशोधकांप्रमाणे मलाही वाटतो.

✧✧

**– अनन्या जोगळेकर** (इ. ९ वी)
ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे ३०

Jnana Prabodhini Samshodhan Sanstha's
**Jnana Prabodhini's Institute of Psychology**
**One year Post Graduate Diploma course after Master's**
**Under University Grants Commission's (UGC)**
**From Academic Year 2015-16**

**"Education of the gifted: methods and strategies"**

(Affiliated to Savitribai Phule Pune University)
From Academic year 2015-16

• First of its kind for teachers, counselors and parents of gifted. • Contribution of foreign faculty and Indian Experts in Gifted Education. • Library includes recently published books and journals on Gifted and related topics. • Strong research back up of forty years' experience in Gifted Education. • Emphasis on Practical Work. • Use of diverse educational technology and new teaching methods. • Opportunities for research and application with gifted individuals in education for gifted.

**Admission forms available from 15th of June 2015.**
**Last date of form submission 15th of July 2015.**

Eligibility- **M.A.** (Psychology), **M.Ed., M.Sc.** (Human Development), or **M.S.W**
**Selection by Entrance Test, academic record and Interview**
**Duration -** 1 year Full Time Medium: English, Limited seats only 20. University and UGC rules apply
**Website :** www.jpip.org Email: gateacademics@jnanaprabodhini.org
**Contact Tel No. (020) 24207204 / 24207142**


*विठ्ठल आचार विठ्ठल विचार। दावी निरंतर पाय आता।*

**अधिक माहिती मिळवा...** सर्वात मोठे वाळवंट – थरचे वाळवंट, राजस्थान

**प्रायोजक – श्री. सौरभ सुधीर दप्तरदार, पुणे**

# पंढरीची वारी



**खूप मोठ्ठा वारकरी समुदाय दरवर्षी मोठ्या उत्साहानं आणि मोठ्या संख्येनं वारीमध्ये सहभागी होत असतो. असं वाटतं जणू हा आषाढी पाऊसच पंढरपुराकडे बरसत आहे. पण हा पाऊस असतो भक्तांचा आणि त्यांच्या अतूट भक्तीचा. ही त्यांची भक्ती आपलंच मन भारावून टाकते आणि मग आपल्याला वाटतं, आपणही एकदा हा वारीचा अनुभव घ्यायलाच हवा!**

*पंढरीचा वारकरी, वारी चुको नेदी हरी।*
*चंद्रभागे स्नान, तुका मागे हेची दान।।*

वारी म्हणजे फक्त भक्तीचा वारसा नाही तर शिस्तीचा भव्य समुद्रही आहे. हे सगळं मी स्वत: अनुभवलं, प्रत्यक्ष पाहिलं. विश्रांतवाडीपासून पुण्यातील संचेती हॉस्पिटलपर्यंतचा टप्पा आम्ही वारकऱ्यांबरोबर पार केला. त्या प्रसन्न, पवित्र वातावरणात गडबड, गोंधळ कुठेच नव्हता. या वारीत वारकरी आनंदात, उत्साहात होते. सगळेच एकमेकांना मदत करत होते. एकमेकांना समजून घेत होते. इतकंच नाही, तर ते समोरच्यातच देव मानून त्यांना नमस्कारही करत होते. अगदी आमच्यासारख्या मुलांनाही त्यांनी वगळले नाही. प्रत्येकाला आदराची वागणूक द्यावी वगैरे गोष्टी आपण नेहमी म्हणतो. वारीत याचा प्रत्यक्ष अनुभव आला. अगदी लहान मुलापासून वृद्ध व्यक्तीपर्यंत 'माऊली' या नावाने सर्वजण एकमेकांना संबोधत होते. तर असे हे निर्मळ मनाचे वारकरी या वारीत सहभागी होतात म्हणूनच वारीतील वातावरण प्रसन्न, उत्साही वाटते.

वारीला जाण्याआधीच आम्ही खूप उत्सुक होतो. अनेक प्रश्न मनात होते. बसलेल्या वारकऱ्यांशी गप्पा मारल्या आणि त्यातूनच आम्हाला आमच्या प्रश्नांची उत्तरंही मिळाली. आम्ही वारकऱ्यांकडून नवीन अभंग शिकलो. आम्हाला वाटलं होतं की, हे सगळे वारकरी शेती वगैरे सगळं सोडून कसे बरे येतात? त्यांना दरवर्षी वारीत सहभागी होण्याची इच्छा कशी होते? आणि संपूर्ण वारीभर इतकं अंतर ते कसं चालू शकतात? या आणि अशा प्रश्नांची उत्तरं आम्हाला वारकऱ्यांशी बोलल्यावर मिळाली. वारकऱ्यांच्या ठायी असलेली पांडुरंगाची भक्ती हीच वारकऱ्यांना शक्ती देते, हे स्वत: वारीचा अनुभव घेतल्यावर कळलं.

ही वारी म्हणजे शिस्तीचा आदर्शच जणू. आता एवढा मोठा जनसमुदाय असताना मला प्रश्न पडला की हे सगळं शिस्तीतच कसं होतं? पण आम्ही वारीत सहभागी झाल्यानंतर त्याचा उलगडा झाला. प्रत्येक गावाची एकेक दिंडी होती आणि या दिंडीत त्या-त्या गावाचे लोक होते. प्रत्येक दिंडीत सर्वात पुढे असणाऱ्या व्यक्तीकडे भगवा ध्वज होता. दुसऱ्या एका व्यक्तीकडे त्या-त्या दिंडीच्या क्रमांकाची व नावाची पाटी होती. प्रत्येक दिंडीचा दिनक्रम ठरलेला असायचा आणि त्याचप्रमाणे सगळं पार पडत असे. ही प्रत्येक दिंडी वारीच्या समुद्राला मिळणारी एक एक नदीच असते जणू. हा भक्तीचा सागर तहान-भूक विसरून पंढरीकडे लोटतो असं मला वाटतं.

या सगळ्यात आम्हाला जेवायला बराच उशीर झाला. आम्हाला किती वेळ झाला, आपण किती लांब आलो आहोत. याचा अंदाजही आला नाही. यामुळे आम्हाला कळलं की 'तहान-भूक' विसरून जाणं म्हणजे काय असतं.

या वारीत भरपूर चालल्यानंतर आम्ही दमलो होतो; पण अजिबात कंटाळलो नव्हतो. पण जेव्हा आम्हाला आमच्या मैत्रिणी भेटल्या तेव्हा असं झालं होतं की, कधी एकदा त्यांना आमचा अनुभव सांगतो. आम्हाला खूप मजा आली. आम्ही याही वर्षी नक्की जाणार हे मागच्याच वर्षी ठरवलंय, कितीही पाय दुखले तरी.

✧✧

– **कु. गार्गी देवचके** (इ. ९ वी)
हायब्लिस सोसायटी, धायरी, पुणे ४१




*गान गाऊ नाम ध्याऊ। नामे विठोबासी पाहू।।*

**अधिक माहिती मिळवा...** सर्वात जास्त उंचीवरील धावपट्टी – लेह, लडाख

**प्रायोजक - श्री. जगजीत कुलकर्णी, चिंचवड, पुणे**

**पाहिलेच पाहिजे असे काही...**




# Fast and Furious - 7

ब्रायन ओ कॉनर आणि डॉमनिक टोरेटो या दोन पात्रांना कोण ओळखत नाही! ही पात्रं जगप्रसिद्ध *Fast and Furious* या मालिकेतली आहेत. पॉल वॉकर आणि विन डिझेल यांनी अनुक्रमे ही पात्रं निभावली आहेत. या मलिकेची सुरुवात २००१ साली *Fast n Furious* या चित्रपटापासून झाली.

काही चित्रपट प्रबोधन करणारे असतात तर काही ऐतिहासिक असतात. काही काल्पनिक असतात तर काही सत्य घटनांवर आधारित चित्रपट असतात. पण ज्या चित्रपटाविषयी मी सांगतोय तो म्हणजे जेम्स वॅन दिग्दर्शित *Fast and Furious 7!!* ही चित्रपट मालिका प्रेक्षकांचं निखळ मनोरंजन करते.

पॉल वॉकर आणि विन डिझेल यांनी सातही भागांत उत्तम अभिनय केला आहे. सर्व भागांत हे दोन अभिनेते मुख्य भूमिकेत आहेत. पण खलनायक प्रत्येक भागात बदलत राहिले आहेत. या चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांना अचंबित करणाऱ्या आणि चित्तथरारक अशा कारच्या करामती (Stunts) बघायला मिळतात. चित्रपटाची कथा लॉस अँजेलिस, टोकियो, आबुधाबी अशा नयनरम्य शहरांमध्ये घडते. चित्रपटाची रोमांचक कथा प्रेक्षकांना खिळवून ठेवते. या भागात खलनायक आपल्या भावावर झालेल्या हल्ल्याचा बदला घेण्यासाठी सूडबुद्धीने पेटून उठतो. आंतरराष्ट्रीय गुन्हेगार असणाऱ्या खलनायकाच्या या भावाला पकडण्याचा ब्रायन ओ कॉनर अणि डॉमनिक टोरेटो व त्यांचे मित्र चंग बांधतात त्यांना *FBI Oficer* ची साथदेखील मिळते. त्यामध्ये त्यांची *टीम* यशस्वी होते का? हे पाहणे उत्कंठापूर्ण ठरते.

हा चित्रपट उत्कृष्ट बनवण्याची वाट मात्र अतिशय खडतर होती. *Fast and Furious 7* हा चित्रपट मालिकेतला सातवा भाग असून, हा चित्रपट २०१५ चा सर्वात प्रलंबित चित्रपट होता. ३० नोव्हेंबर २०१३ या दिवशी चित्रपटातील मुख्य कलाकार 'पॉल वॉकर' चा कार अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. चित्रपटाचं अर्ध चित्रीकरण अजून बाकी होतं. मुख्य कलाकाराशिवाय चित्रपटाचं पुढचं चित्रीकरण होणार तरी कसे? चित्रीकरण बरेच महिने ठप्प पडलं. चित्रपट प्रदर्शनाची तारीख तर जाहीर केली होती. मग मूळ कथेत थोडा बदल करून उरलेले चित्रीकरण पॉल वॉकरच्या भावाच्या- कोडी वॉकरच्या मदतीनं पूर्ण झालं. काही महत्त्वाच्या प्रसंगी विशिष्ट सॉफ्टवेअर वापरून काही दृश्यांमध्ये 'पॉल'चा आभास निर्माण केला आहे. त्या दृश्यांना संगणकाच्या साहाय्यानं पॉलचा आवाजही देण्यात आला आहे.

या चित्रपटाच्या सर्व कलाकारांइतकीच चित्रपटाची तांत्रिक बाजू सांभाळणाऱ्या लोकांनीही विशेष मेहनत घेतलेली चित्रपट पाहाताना जाणवते. 'जेम्स वॅन' याने चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. चित्रपटाच्या शेवटी पॉल वॉकर यांनी अभिनय केलेल्या त्यांच्या आधीच्या चित्रपटातील काही दृष्ये संकलित केली आहेत. अशाप्रकारे माहितीपट बनवून पॉल वॉकरला भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आहे. ज्या माणसानं आपलं सारं आयुष्य कारच्या करामती (Stunts) करताना घालवलं त्याचा मृत्यू कार अपघातात होणं हे फारच दुर्दैवी आहे.

ज्यांना वेगवान कथानक आणि कारच्या चित्तथरारक करामती पाहायला आवडतात, त्यांच्यासाठी हा चित्रपट मेजवानी ठरेल, यात शंका नाही.

✧✧

**- चि. रुचिर कुलकर्णी** (इ. १२वी)
सी- २०४, पाटे संस्कृती, सहकारनगर क्र. २, पुणे ९



*आम्ही देवाचे, दैवाचे। दास पंढरीरायाचे।।*

**अधिक माहिती मिळवा...** सर्वात उंच गुहा - अमरनाथ, जम्मू काश्मिर




**प्रायोजक - श्री. निखिल धारवाडकर, बंगळुरू**

# ओढ

माझ्या मनी ओढ आहे
उगवत्या सूर्याची
उसळत्या दर्याची
फेसाळत्या लाटांची।।१।।

माझ्या मनी ओढ आहे
उगवत्या अंकुराची
उमलत्या कलिकेची
सृजनाच्या निर्मितीची ।।२।।

माझ्या मनी ओढ आहे
वादळातल्या वाऱ्याची
झेपावणाऱ्या पक्ष्याची
धगधगत्या अग्नीची।।३।।



माझ्या मनी ओढ आहे
हंबरत्या गाईची
मातेच्या ममतेची
कोमल स्पर्शाची।।४।।

माझ्या मनी ओढ आहे
अखंड सत्याची
संतांच्या भक्तीची
निरपेक्ष सेवेची...।।५।।

**– कु. वेदश्री पुराणिक** (इ. ८ वी)
तात्यासाहेब सामंत विद्यालय, चाळीसगाव



## छात्र प्रबोधनतर्फे अभिवाचन स्पर्धा

**मराठी साहित्याविषयी वाचनाची गोडी वाढावी, प्रभावी प्रकट वाचन करता यावे, गटाने मिळून एकत्र काम करावे, तुमच्यातील कल्पकता, सुप्त कलागुणांना वाव मिळावा या हेतूने या स्पर्धेचे आयोजन**

**या स्पर्धांमध्ये शाळांतर्फे किंवा स्वतंत्रपणेही गट सहभागी होवू शकतील.**

**स्पर्धेचा तपशील :**
* इ. ७ वी ते इ. १० वी मधील विद्यार्थ्यांचा सहभाग असावा.
* सहभागी गट ५ ते ७ जणांचा असावा.
* अभिवाचनासाठीचे साहित्य छात्र प्रबोधनच्या **वर्ष १४ (ऑक्टोबर २०१३ ते सप्टेंबर २०१४)** च्या अंकामधील असावे.
* ज्या शाळा व गटांकडे छात्र प्रबोधनचे अंक नसतील त्यांना छात्र प्रबोधनच्या कार्यालयातून ते अंक मिळू शकतील. (वार्षिक संच ₹ १०० ला मिळेल तर संगणकावरील पीडीएफ फाईल ₹ ५० ला मिळू शकेल.)
* अभिवाचनासाठी मध्यवर्ती सूत्र अथवा विषय असावा व त्याभोवती निवडलेल्या साहित्याची गुंफण केलेली असावी.
* अभिवाचन कार्यक्रम **३० ते ४० मिनिटांचा** असावा.

**बक्षिसे : प्रथम : ₹ १०००, द्वितीय : ₹ ८००, तृतीय : ₹ ७००, उत्तेजनार्थ : ₹ ४००**

(यातील निम्मी रक्कम शाळेसाठी व निम्मी रक्कम विद्यार्थ्यांना पुस्तके/मासिकाची वर्गणी या स्वरूपात दिली जाईल.)

**स्पर्धेची नावनोंदणी : दि. १४ ऑगस्ट २०१५ पर्यंत, नोंदणी शुल्क : ₹ ५० मात्र.**

**स्पर्धा दिनांक : ११ व १२ सप्टेंबर २०१५ स्पर्धेचे ठिकाण : ज्ञान प्रबोधिनी, पुणे**

(स्पर्धेची वेळ सहभागी गटांना नंतर कळविली जाईल.)



**अधिक माहितीसाठी संपर्क : ई मेल :** chhatraprabodhan@ jnanaprabodhini.org

**दूरभाष : (०२०) २४२०७ १७४/१७५**

*पंढरीची वारी जयाचिये कुळी। त्याची पायधुळी लागे मज।।*

**अधिक माहिती मिळवा...** सर्वात मोठे गुहामंदिर – कैलास मंदिर, एलोरा

**प्रायोजक - श्री. अजित कानिटकर, पुणे**

*गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु, गुरुर्देवो महेश्वरः।*
*गुरुः साक्षात् परब्रह्म, तस्मै श्रीगुरवे नमः।।*

जीवन म्हणजे कधी आनंद तर कधी दुःख, कधी सुख तर कधी अडचणी सामावलेला एक लांबलचक सुंदर प्रवास. पण या प्रवासाला लागते ती ज्ञानाची, शिक्षणाची जोड. अज्ञानाशी लढाई करण्याचे उत्तम शस्त्र म्हणजे ज्ञान ! ज्ञान, शिक्षण म्हटले म्हणजे गुरू आलेच!! आपल्या आयुष्यात गुरुला अगदी अनन्यसाधारण स्थान असते.

आपल्या बालपणापासूनच आपल्या आयुष्यात गुरुला खूप मोठे स्थान असते. आपला पहिला गुरू म्हणजे आपली आई. लहानपणापासूनच आपल्यावर संस्कार करण्याचे अद्वितीय कार्य आपली आई करत असते. थोडे मोठे झाल्यावर आपल्या आयुष्यात बरेच गुरू येतात. ते म्हणजे शालेय जीवनातील आपले गुरू. आपण आपल्या भविष्यातील सुंदर वाटेवर असताना आपल्याला तेथपर्यंत नेण्याचे काम आपले गुरूच करतात. आपली जडणघडण करतात, आपल्याला ज्ञान देतात, आपल्यावर संस्कार करतात, आपला सर्वांगीण विकास करतात.

आपले गुरू म्हणजे केवळ कोणी एक व्यक्ती नव्हे तर आपल्या आयुष्यात ज्ञान देणारे, संदेश देणारे सर्वजण. जीवनाच्या शाळेत 'अनुभव' हा थोर गुरू आहे. तसाच 'निसर्ग' हा सुद्धा एक गुरूच आहे.

अशा या गुरू-शिष्याच्या अलौकिक नात्यावरूनच गुरुपौर्णिमा हा दिवस अस्तित्वात आला. गुरुपौर्णिमा म्हणजेच आषाढ शुद्ध पौर्णिमा किंवा व्यासपौर्णिमा होय. या दिवशी सर्वत्र गुरुपूजन करण्याची आपली प्राचीन परंपरा आहे. त्याचप्रमाणे काही ठिकाणी व्यासपूजन करण्याचीही प्रथा आहे.

अत्यंत बुद्धिमान, खूप साहित्य ज्यांनी निर्माण केले असे व्यास मुनी. त्यांचा जन्म यमुनेच्या काठी एका बोरीच्या बेटावर झाला म्हणून त्यांना 'बादरायण' किंवा 'द्वैपायन' असेही म्हणतात. पूर्वी अध्ययनासाठी एकच विशाल वेदशास्त्र होते. परंतु मानवांचे अल्पायुष्य व बुद्धिसामर्थ्य लक्षात घेऊन त्यांनी त्याचे विभाजन केले व त्या वेदांचे रक्षणही केले. 'व्यास' या शब्दाचा अर्थच



# ।। तस्मै श्रीगुरवे नमः।।

**- कु. मानसी पूरकर**

विभाजन करणारा होतो. व्यास मुनींचा लेखनविस्तारही प्रचंड होता. त्यांच्या लेखनात महाभारत, अठरा पुराणे, भागवत या सर्वांचा समावेश होता. व्यासांनी आपल्या लेखनाच्या रूपाने जगातील सर्व विषयांना स्पर्श केला. प्राचीन वेद, उपनिषदे म्हणजे ज्ञानाचे भांडारच. या ज्ञानाबरोबर उत्तम संस्कारही आपल्याला मिळतात.

*अष्टादशपुराणेषु व्यासस्य वचनद्वयम् ।*
*परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम् ।।*


व्यासांचा लेखनविस्तार, प्रगाढ पाण्डित्य पाहून विस्मित झालेल्या विद्वान पण्डितांनी व्यासांना 'जगद्गुरू' मानले. म्हणूनच गुरुपौर्णिमा हीच व्यासपौर्णिमा मानली जाते.

गुरुप्रति प्रत्येकाच्याच मनात आदर, भक्ती असते. परंतु गुरुप्रति विशेष आदर व भक्ती व्यक्त केलेल्या गुरू-शिष्याच्या काही जोड्या त्यांच्यापुढे आपल्याला



अधिक माहिती मिळवा... सर्वात उंच शिखर - काराकोरम

प्रायोजक - सौ. गीतांजली हेमंत जोशी, वाशी, नवी मुंबई



नतमस्तक करतात. द्रोणाचार्य व एकलव्य, रामकृष्ण परमहंस व विवेकानंद हे गुरुशिष्य म्हणजे गुरुभक्ती, गुरुनिष्ठा व त्यागाचे आदर्श आहेत.

आपण आपल्या शाळेत नेहमी गुरुपौर्णिमा साजरी करतो. शिक्षकांचे सत्कार केले जातात. आपण गुरुपौर्णिमा नेहमी अशाच पारंपरिक पद्धतीने साजरी करतो. मात्र विज्ञान-तंत्रज्ञानात काळानुरूप बदल होतात, तसेच आपणही आपल्यामध्ये नवविचारांची नांगरणी, पेरणी करायला हवी. काळानुरूप, पर्यावरणाला अनुसरून अशी जरा वेगळ्या प्रकारची गुरुपौर्णिमा आपण साजरी करायला हवी. आपण एखाद्या मोठ्या, मोकळ्या जागेत जाऊन तेथे शिक्षकांच्या हस्ते वृक्षारोपण करू शकतो. त्यांनी गुरुपौर्णिमेला लावलेल्या त्या झाडांची आपण नीट काळजी घेऊ शकतो. त्या त्या झाडाला ज्या शिक्षकांनी ते लावले, त्यांच्या नावाची पाटी लावायची म्हणजे जरी काही वर्षांनी त्यांच्या सोबतचा आपला सहवास तुटला, तरी त्यांनी लावलेल्या त्या झाडासोबतचा सहवास कधीही तुटणार नाही.

आपण गुरुपौर्णिमेला रक्तदान शिबिरही घेऊ शकतो. ज्ञानदानाबरोबरच रक्तदानही तितकेच महत्त्वाचे दान असते. अशा प्रकारचे दान करून आपण एखाद्या मृत्यूच्या दारात असलेल्या व्यक्तीला वाचवून पुण्य व एक वेगळ्याच प्रकारचा आनंद मिळवू शकतो. हल्लीचे वाढते प्रदूषण बघता आपण गुरुपौर्णिमेला प्रतिज्ञा घेऊ शकतो की, मी किमान दोन दिवस तरी कोणत्याही प्रकारचे प्रदूषण करणार नाही. यामुळे थोडे का होईना प्रदूषण कमी होईल. आपण गुरुपौर्णिमेला शाळेजवळच्या परिसरात स्वच्छता अभियानही घेऊ शकतो. म्हणजेच आपण स्वच्छता अभियान राबवण्यातही आपले योगदान देऊ शकतो.

आपल्याला नेहमी आपले गुरू ज्ञान देतच असतात. परंतु आपल्या आजूबाजूच्या परिसरात असेही काहीजण असतात की, ज्यांना शिक्षण मिळत नाही. त्यांच्यात शिक्षणाबद्दलची गोडी निर्माण करू शकतो. त्यांच्यातील आत्मविश्वास वाढवू शकतो. ज्याप्रमाणे गुरू आपल्याला ज्ञान देतात त्याचप्रमाणे त्यांनाही गुरुंकडून ज्ञान मिळवण्याची संधी देऊ शकतो.

आपल्या अनेक जुन्या पिढीतील गुरुंना आजच्या काळातील कॉम्प्युटर, इंटरनेट वापरता येत नाही. गुरुपौर्णिमेच्या दिवशी आपण त्यांचे गुरू होऊन या गोष्टी त्यांना शिकवण्याची सुरुवात करू शकतो.

असे वेगवेगळ्या प्रकारचे पर्यावरणपूक व आगळेवेगळे उपक्रम आपण गुरुपौर्णिमेला राबवू शकतो. पूर्वीच्या काळात शिष्य गुरुंना आगळीवेगळी दक्षिणा देत असत. त्याप्रमाणे आपणही आपल्या गुरुंना वेगळ्या प्रकारच्या उपक्रमांची गुरुदक्षिणा देऊ शकतो.

गुरू आणि शिष्य या संज्ञा परस्पर पूरक आहेत. गुरुशिष्यांच्या अतूट व सजीव आणि सापेक्ष संबंधामुळे गुरुपौर्णिमेला अनन्यसाधारण महत्त्व असते.

गुरुने आपल्यावर जे सुसंस्कार केलेले असतात, ते कधीही आपण विसरू शकत नाही. व्यवहारी जगाच्या रणरणत्या उन्हात, ज्ञानाची शीतल छाया देणाऱ्या गुरुंचे आम्ही नित्य स्मरण ठेवू.

*गुरुने दिला ज्ञानरूपी वसा,*
*आम्ही चालवू हा पुढे वारसा !*

तर मित्रांनो, या वेळी साजरी करणार ना अशी आगळी वेगळी गुरुपौर्णिमा?

✧✧

**– कु. मानसी पूरकर** (इ. १० वी)
कमलाबाई शंकरलाल कन्या शाळा, धुळे



विठ्ठल माऊली कृपेची कोवळी। आठविता घाली प्रेमपान्हा।।

**अधिक माहिती मिळवा...** सर्वात मोठे चर्च – सेंट कॅथेड्रल, गोवा

**प्रायोजक - श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे**

आयुष्यात यशस्वी झालेली ईशा अजून मोठमोठी स्वप्ने बघत असते. 'माझे' हॉटेल, 'माझे' यश या शब्दांपासून आपल्या पृथ्वीच्या यशाकडे तिची पावले कशी वळतात, ते वाचूयात या कथेतून!

# आणि... तिचे डोळे उघडले

– कु. अश्विनी पाटील

ईशा, 'Foods Treasure', या हॉटेलची मालकीण. या हॉटेलनं तिचं सगळं आयुष्यच बदलून टाकलं होतं. पुण्याच्या मध्यवर्ती भागात असलेलं आणि अतिशय नावाजलेलं असं हे हॉटेल. आता ती ईशा नाही तर ईशा मॅडम झाली होती. तेही या हॉटेलमुळेच. पण म्हणतात ना! मानवी मन हे कधीच समाधानी नसतं. म्हणून तिनं एका निसर्गरम्य अशा ठिकाणी एक छानशी जागा घ्यायचं ठरवलं व तिथे आणखी एक मोठं हॉटेल बांधून आपलं वैभव आणखी वाढविण्याचं ठरवलं.

आता तिची पावले तिच्या निसर्गरम्य नव्या हॉटेलच्या जागेकडे वळू लागली. चालता चालता तेवढ्यात तिच्या वाटेत एक नागराज येऊन ठेपला. जणू तो तिला अडवायलाच उभा होता. ती फारच घाबरली. तिला त्या जागेवर जाण्यापासून परावृत्त करणे, हाच जणू त्या नागाचा हेतू होता. ईशा मॅडम घाबरल्या होत्या; पण त्यांनी स्वत:ला सावरून घेतले आणि त्या परत मार्गक्रमण करू लागल्या. तिच्या नियोजित जागेवर पोहोचताच तिनं 'दामू' असा आवाज दिला आणि खोपट्याचा दरवाजा खाडकन उघडला. खोपट्यातून एक दाढीमिशीवाला, खांद्यावर कुऱ्हाड घेतलेला उंचापुरा, धिप्पाड असा माणूस बाहेर आला. तो एक लाकुडतोड्या होता. तिनं जागेकडे इशारा करताच त्यानं झपाझप पावलं टाकत झाडाकडे जाऊन झाडांवर घाव घालण्यास सुरुवात केली तेवढ्यात त्याला *'आई गं!'* असे उद्गार कानी पडले व तो गोंधळला. पुन्हा दुसरा घाव घातला तेवढ्यातच *'आई गं! कंबरडं मोडलय माझं!'* असे बोल ऐकू आले. आता मात्र तो घाबरला होता. तो घाबरतच म्हणाला, ''ईशा मॅडम! मला येथे फारच विचित्र आवाज ऐकू येत आहेत. पण आजूबाजूला मात्र कोणीच दिसत नाही.''

*"What nonsense!"* उगीचच काहीही वेड्यासारखं बडबडू नकोस, तिथं कोणी दिसतंय का तुला? कर तुझं काम.'' ईशा मॅडमनं आदेश दिला. तो पुन्हा कामाला लागला आणि पुन्हा हेच घडलं. मग तो पुन्हा ईशाकडे जाऊन म्हणाला, ''मॅडम, माझ्यावर विश्वास ठेवा. हवं तर तुम्ही स्वत: येऊन पाहा काय घडतंय ते.'' ईशाला वाटलं हा काम चुकवण्याचा प्रयत्न करतोय. जाऊन तर बघू, नक्की काय घडतंय ते! त्यानंतर तिथं ईशा





*तुम्ही आम्ही जाऊ चला। भेटू जिवलग विठ्ठला।।*

**अधिक माहिती मिळवा...** सर्वात मोठा गुरुद्वारा – सुवर्णमंदिर, अमृतसर

**प्रायोजक - श्री. सुरेंद्र कापसे, प्रिस्टन, अमेरिका**

पोहोचली आणि तिनं पुन्हा दामूला सूचना दिल्या, ''चल, कामाला लाग.'' दामूने पुन्हा एकदा जोरात कुऱ्हाडीचा घाव त्या वृक्षावर घातला. तोच काय आश्चर्य! खरंच, *''अरे, थांब जरा! आणखी किती रे घाव घालशील माझ्यावर?''* असं वाक्य ईशाच्या कानावर पडलं. आता तीही घाबरली आणि विचारात पडली. हे नक्की घडलं तरी कसं?

ईशा म्हणाली, ''कोण आहे तिकडे? समोर या.'' पण कुणीच उत्तर दिली नाही. काही वेळानंतर अतिशय चिंतामय अशा आवाजात उत्तर आलं, *''नका रे आमच्यावर असा अन्याय करू. आणि मी कोण? हा प्रश्न तुम्हाला सतावतोय ना? तर सांगतो, हाच वृक्ष बोलतोय, ज्याच्यावर तुम्ही कुऱ्हाडीनं एका मागून एक घाव घालताय!''*

ईशानं आश्चर्यानं विचारलं, ''पण तू बोलू कसा शकतोस?''

तेव्हा झाड उत्तरलं,

*''अगं! डॉ. जगदीशचंद्र बोस यांनीच स्पष्ट केलं की आम्हीही तुमच्याप्रमाणेच सजीव आहोत आम्हालाही भावना असतात. अगदी तुमच्यासारख्याच. तुम्हाला थोडं जरी लागलं तरी तुम्ही आकाश-पाताळ एक करता. असाच आमचाही विचार करा की!'* त्यानंतर तो दु:खाच्या स्वरात म्हणाला, *''तुमच्यासारख्या कित्येक लोकांनी माझ्या कित्येक नातलगांना अशाच प्रकारे ठार केलंय. तुमच्यापासून एखादी तुमची अगदी जवळची व्यक्ती हरवली तर तुम्हाला किती वाईट वाटतं! तसं आम्हाला नाही का वाटणार? आमच्याकडे तुम्हाला विचारण्यासारखे खूप सारे प्रश्न आहेत. पण तुमच्याकडे त्यांची उत्तरं नाहीत. आम्हीच तर पर्यावरणाचे संतुलन राखतो, आम्हीच प्राणवायू देतो, सध्याच्या काळात तुमच्यासमोर पाणी टंचाईचा प्रश्न उभा राहिला आहे. याचं कारणही तुम्हीच आहात. तुम्ही जर कत्तल कराल तर नुकसान तुमचंच होणार आहे. आम्हाला वाढवा, जन्म द्या, दया करा रे माणसांनो आमच्यावर.''* झाडाचं गाऱ्हाणं ऐकून ईशालाही गहिवरून आलं व तिनं झाडाला मिठी मारली. झाडाच्या घावांवरून मायेनं हात फिरवला. तेवढ्यातच फोनची रिंग वाजली. ईशा स्वप्नातून खाडकन जागी झाली.



जे स्वप्न तिनं पाहिलं होतं त्यानं ईशाचा थरकाप उडाला होता. मोठेपणी ईशाला स्वत:चं हॉटेल थाटायचं होतं. पण त्यासाठी आता ती वृक्षांचा बळी देणार नव्हती. यापुढे झाडांचं जतन आणि संवर्धन करून पृथ्वी वाचवण्याचा मनोमन निश्चय करून ती शाळेत जाण्याची तयारी करू लागली...

✧✧

- **कु. अश्विनी पाटील** (इ. ८वी)
तात्यासाहेब सामंत विद्यालय,
चाळीसगाव



*नामा म्हणे विठो पंढरीचा राणा। डोळिया पारणा होत असे।।*



**अधिक माहिती मिळवा...** सर्वात मोठी लेणी - एलोरा, अजिंठा

**प्रायोजक - श्री. अतुल कुलकर्णी, पुणे**



# सफर शिवथरघळीची

– कु. देवश्री जोगळेकर

**समर्थ रामदासांच्या चरणस्पर्शाने पावन झालेलं एक निसर्गरम्य ठिकाण शिवथरघळ! तिथल्या वैशिष्ट्यांबद्दल, घळीबद्दल लिहिताना काही आठवणी जाग्या झाल्या. त्या तुमच्यापर्यंत पोहोचवण्याचा छोटासा प्रयत्न!**

महाराष्ट्राला संतांची मोठीच देणगी मिळाली आहे. महाराष्ट्रातील एक प्रभावशाली संत म्हणजे समर्थ रामदासस्वामी! इतर संतांपेक्षा त्यांनी त्यांच्या कार्याने वेगळाच आदर्श सर्वांपुढे घालून दिलेला आहे. कारण त्यांनी नेहमीच साधनेसोबत बलोपासनेला महत्त्व दिले आहे.

अशा रामदासस्वामींचं सज्जनगडावर वास्तव्य असलं तरी 'शिवथरघळ' हे तितकंच तुल्यबळ व महत्त्वाचं ठिकाण! कारण इथे बसूनच त्यांनी जनसामान्यांना व्यवहारज्ञानाबद्दल उत्तम उपदेश करणारा ग्रंथ श्रीमत् दासबोध लिहिला. तसेच 'मनाच्या श्लोकां'ची निर्मितीही त्यांच्या इथल्या वास्तव्यात झाली.

या शिवथरघळीचं महत्त्व साहित्यातच नव्हे तर इतिहासातही आहे. कारण इथे राहूनच तर बरेचदा रामदास स्वामी शिवाजी महाराजांना महत्त्वाचे संदेश पाठवायचे व त्यांच्या शंकांचे निरसन करायचे. बऱ्याच खलबतांसाठी युक्त्या सुचवायचे. हे काम अडसर न येता होण्याचे कारण म्हणजे घळीचे भौगोलिक स्थान! इथली घळ नैसर्गिकरित्याच खूप आल्हाददायक आहे. मंदिर व सभामंडप तर सुरेखच! इथला दिनक्रम अतिशय नेटका असतो. सर्वच गोष्टी सुनियोजित असतात. जर पहाटे पहाटे आपण घळीत जाऊन ध्यानाला बसलो तर आपल्या मनाला एक वेगळीच शांतता मिळते. तिथून येता येता कानी, मंत्रमुग्ध करणारी काकड आरती ऐकू येते तेव्हा तर फार पवित्र वाटतं. देवाचे भजन, कीर्तन तसेच मनन, चिंतन यासाठी शहराच्या गर्दी-गोंधळापासून दूर सर्वात उत्तम ठिकाण आहे हे.

अशा या ठिकाणाशी माझा संबंध मागील वर्षीच्या जानेवारीत आला. इ. आठवीतील 'विद्याव्रत पूर्वतयारी शिबिरा'साठी आम्हाला तिथे नेण्यात आलं. इथल्या लोकांची बोलण्याची पद्धत, विचार, आचार ऐकून व बघून मला एका भजनाची आठवण होते.

कोमळ वाचा दे रे राम।
विमळ करणी दे रे राम।
अंतरपारखी दे रे राम।
बहुजन मैत्री दे रे राम।
तद्रुपता मज दे रे राम।
अर्थारोहण दे रे राम।
तुझी आवडी दे रे राम।
दास म्हणे मज दे रे राम।

आणि असं वाटतं की त्या ठिकाणी रामराया ती मागणी मुक्त हस्ताने पूर्ण करतोय! इथे आपल्याला बरंच काही शिकायला मिळालं. आपल्याला स्वत:साठी वेळ देऊन वागणूक, विचार, आचार, भाषा, ज्ञान यांवर मनन व चिंतन येथील नीरव शांततेत करता येते.

या ठिकाणची अनुभूती काही निराळीच! इथे नेहमी सुरक्षित, शांत, आनंदी वाटतं. इथून कुठे जाऊच नये असं वाटतं. जेव्हा इथे बसून आपण रामदासस्वामींच्या, शिवाजी महाराजांच्या व प्रभू श्रीरामाच्या गोष्टी एकतो तेव्हा त्या आपल्या



*पंढरीचा वास घडो तुझी सेवा। हेचि दान देगा देवा।।*

**अधिक माहिती मिळवा...** सर्वात उंच पुतळा – गोमटेश्वर मूर्ती, कर्नाटक

प्रायोजक - श्री. विद्याधर जोगळेकर, पुणे



डोळ्यांसमोर घडत आहेत असंच वाटतं. तिथे देवाचा वास असल्याची जाणीव क्षणोक्षणी होते. इथे राहण्याची सोयही उत्तम आहे. हे ठिकाण लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांनी पाहाण्यासारखं आहे. जिथे एकदा गेल्यावर परत परत जायची इच्छा होते व तिथल्या शांत वातावरणात स्वत:चा शोध घ्यायला आवडतेच! असं हे सगळं वाचल्यावर शिवथरघळीबाबत तुमची उत्सुकता नक्कीच वाढली असणार! मग कधी जाताय शिवथरघळीत?

✧✧

– **कु. देवश्री जोगळेकर** (इ. ९ वी), ज्ञान प्रबोधिनी, प्रशाला, पुणे

# आमची इमिकाशाची अविस्मरणीय सहल



**भाषाविषयक प्रकल्प करताना वृत्तपत्रातील भविष्यकाळातील प्रवासवर्णन कसं असेल? हे लिहिण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. आमच्या वृत्तपत्रामधल्या 'मुलांच्या पानातील' हे एक प्रवासवर्णन...**

शेवटी 'तो' दिवस उगवला. त्या दिवशी आमची 'इमिकाशा आकाशगंगे'त सहल जाणार होती. माझ्या आजीला तर माझं फारच कौतुक वाटत होतं. तिच्या लहानपणी दुसऱ्या देशात जाणंही अप्रूप! आणि मी तर चालले होते सरळ दुसऱ्या आकाशगंगेत!

तर मला सगळ्यात जास्त आनंद होत होता, तो 'सहल' जाणार याचा! आता सहल म्हटलं की प्रवास असणारच, म्हणजे *अल्ट्रा व्हायोलेट रेज* ने थेट त्या आकाशगंगेत न जाता, आम्ही आधी मंगळावर भेटलो. आणि सहलीला सुरुवात झाली! आम्ही चक्क यानाने 'इमिकाशात' पोचलो. यानात आम्ही खूप मजा केली. तिथे पोचल्यावर दोन सूर्यमाला पाहिल्या. 'इतिवाशी' सूर्यमालेत 'याशिका' ग्रहावर आम्ही जेवलो. याशिका खूप सुंदर आहे. पृथ्वीसारखाच निळा समुद्र, हिरवी जंगलं, उंच पर्वत, अगदी जुळा ग्रहच. मग दोन्ही सूर्यमालांमधील सारे ग्रह पाहिले. पाच दिवसांच्या वास्तव्यात तिथे खूप फिरलो. मजा केली, वेगवेगळे ग्रह पाहिले, नव-नवीन मित्र जोडले, त्यांच्याशी खेळलो, त्यांनी आम्हाला त्यांचे खेळही शिकवले. 'बाजुका' या ग्रहावर जेव्हा आम्ही गेलो, तेव्हा त्यांच्याकडे चक्क 'पृथ्वीग्रहण' होतं. त्यांच्याकडून पृथ्वी कशी दिसणार, याचे समर्पक उत्तर त्यांनी आम्हाला दिले. तिथल्या परग्रहमंत्र्यांनी देखील आमच्याशी खूप छान संवाद साधला.

हा हा म्हणता पाच दिवस कसे संपले, कळलेच नाही. जाताना तिथल्या मित्रांना बाय करताना डोळ्यांत अश्रू आले. यापुढे e-alien वर आम्ही नक्की गप्पा मारू. तर अशी झाली आमची अविस्मरणीय सहल!

– **कु. सुरभि भावे, कु. रोहिणी जोशी** (इ. ८ वी), ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे



*चंदनाचा टिळा हसु मुखावरी। किती गोड लागे माझा पांडुरंगा।।*



**अधिक माहिती मिळवा...** सर्वात मोठे संग्रहालय – इंडिया म्युझियम, कोलकता

**श्री. शैलेंद्र केशव म्हसकर, पुणे**, सेंट्रल पेन्शनवर मोफत सल्ला (सायंकाळी), पुरोहित, ज्ञान प्रबोधिनी ☎ २४४५१३१९



# हॅलो, मी मोबाईल बोलतोय...

ट्रिंग... ट्रिंग...! हॅलो! नमस्कार मित्रांनो, 'मला ओळखलंत का? वगैरे काही मी विचारणार नाही; कारण आजकाल तुम्ही २४ तासांपैकी कमीतकमी १६-१७ तास माझ्यासोबतच वेळ घालवता, त्यामुळे मी तसा सर्वांनाच परिचित.

अगदी लहान मुलांपासून ऐंशी वर्षांच्या आजी-आजोबांपर्यंत सर्वजण मला अगदी सफाईने वापरतात. गरीब-श्रीमंत, खरा-खोटा, चांगला-वाईट असा तुमच्यासारखा भेदभाव करणे मला जमत नाही. कारण वरील सर्वच जण माझा सदैव वापर करतात.

माझा सर्वप्रथम वापर केला गेला तो युद्धांमध्ये संदेशवहनाच्या कार्यासाठी. त्यानंतर संदेशवहनाचं एक प्रभावी माध्यम म्हणून मी जगासमोर आलो. अनेक बदलांना सामोरे जात असताना माझं आजचं हे रूप तुमच्यासमोर आलं आहे. आजचं जग वेगानं पुढं जात आहे आणि जगाबरोबरच माझं रूप देखील प्रगत होत चाललेलं आहे.

आता तर फक्त संदेशवहन हा माझ्या वापरामागील मुख्य उद्देश राहिला नसल्याने 'स्मार्टफोन' असं नवं नाव मला मिळालं आहे. गाणे, चित्रे, व्हिडिओ या बरोबरच महत्त्वाचे म्हणजे 'इंटरनेट' यामुळे मला महत्त्व प्राप्त झाले आहे. या इंटरनेटमुळे ज्ञानाचे एक मोठे दालन तुम्हा सर्वांसाठी खुले झाले आहे. तुम्ही जाहिरात पाहिलीच असेल कॉलेजमध्ये प्रवेश न मिळाल्याने बेकरीत काम करणारा मुलगा इंटरनेटच्या साहाय्याने व माझ्या मदतीने यंत्र तयार करतो. त्यावेळी तो काय सांगतो? 'यहाँ कोई भी कुछ भी सीख सकता है, अगर सीखने की चाहत हो तो।' अगदी खरं सांगितलं त्यानं.

मी निर्जीव असलो तरी समाजात घडणाऱ्या अनेक वाईट घटनांचाही मी साक्षीदार आहे. मित्रांनो, माझ्यात असणारी विविध *ॲप्लिकेशन्स*. खरोखरच चांगल्या कामाकरता (त्या जाहिरातीतल्या मुलासारखे) कितीजण वापरतात? प्रत्येक गोष्टीच्या वापराला मर्यादा असतात त्याप्रमाणे मलाही आहेत.

माझ्या अतिवापराने तुमच्या डोळ्यांना, कानांना होणारी इजा तुम्हीच थांबवू शकता. कारण शेवटी मी आहे एक यंत्रच आणि तुम्ही मानव माझे निर्माते. त्यामुळे माझा वापर तुमच्याच हाती आहे. माझे योग्य आणि अयोग्य परिणाम तुम्ही चांगलेच जाणता. तेव्हा चला आता 'कॉल कट' करतो. या कॉलची माहिती तुम्हाला मोबाईलवर दिसणार नाही पण हे संभाषण तुमच्या 'मेमरीत' साठवून ठेवा. त्यावर विचार करा. धन्यवाद!

✧ ✧

**– चि. यदुनाथ कुलकर्णी** (इ. १० वी)
बालशिवाजी माध्यमिक शाळा, अकोला



*दीनांचा तो नाथ, भक्तांचा कैवारी। धावे हाकेला, तो माझा पांडुरंगा।।*



**अधिक माहिती मिळवा...** सर्वात मोठा घुमट – गोलघुमट, विजापूर, कर्नाटक

**प्रायोजक - श्रीमती उमा परांजपे, पुणे**

## प्रतिसादी वाचकवीर व्हा... (वर्ष १५/१०)

### हा अंक वाचा... प्रश्नांची उत्तरे लिहून पाठवा... आणि बक्षीस मिळवा...

या अंकातील प्रश्नांची उत्तरे दि. १५ ऑगस्ट २०१५ पर्यंत 'छात्र प्रबोधन'कडे पाठवा. बक्षीस जिंकण्याची प्रत्येकाला संधी. या निमित्ताने तुम्ही प्रत्येक अंक बारकाईने वाचाल व अंकातील साहित्याचा अधिक आनंद मिळवाल, असा विश्वास आहे.

**प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) कोणकोणत्या जातींच्या वनस्पतींपासून पेट्रोल, डिझेलसारखे इंधन मिळते?

२) ''मित्रा'चे अंगणी' या कथेतील 'मित्र' नक्की कोण होते? टास्कालिगा ग्रहावर गायब झालेल्या शास्त्रज्ञांचा शोध कसा लागला?

३) 'आणि.. तिचे डोळे उघडले' या कथेमध्ये ईशाचे डोळे कशामुळे उघडले?

४) 'येरे येरे पावसा' या लेखातील पावसाचा कोणता प्रकार तुम्हाला सर्वात जास्त आवडला? आणि का?

५) पानाखालच्या तळटिपेतील ओळींमधील 'मोठं', 'उंच', 'लांब' यांविषयी (क्षेत्रफळ/लांबी इ.) अधिक माहिती मिळवा आणि छात्र प्रबोधनकडे पाठवा. (किमान १०)

**विज्ञान कृती**

### सिनेमाच्या पडद्यावर हलणारी चित्रं कशामुळे दिसतात?

कोऱ्या पानांची एक वही घ्या. त्याच्या शेवटच्या पानावर खाली उजव्या कोपऱ्यावर पेनाच्या शाईने एक बिंदू काढा. आता दुसऱ्या पानावर खाली उजव्या बाजूला थोडंसं डावीकडे सरकून पुन्हा एक बिंदू काढा. असं प्रत्येक पानावर थोडंसं डावीकडे सरकत-सरकत बिंदू काढत जा. पहिलं पान येईपर्यंत तुमचा बिंदू डाव्या कोपऱ्यात गेला असेल.

आता वहीची सगळी पानं हातात घ्या. चार बोटं आणि अंगठा यांच्यामध्ये धरा. अंगठा सैल धरून एकेक पान खाली पडू द्या. पानं भराभरा खाली यायला हवीत. बिंदूकडे लक्ष द्या.

प्रत्येक पानावरचा बिंदू तुम्हाला वेगवेगळा दिसणार नाही. तर तो एकच आहे असं वाटेल. आणि आश्चर्य म्हणजे उजवीकडून डावीकडे भर्रकन गेलेला दिसेल. असं कशामुळे झालं?

आपण एखाद्या वस्तूकडे पाहिल्यानंतर त्याची प्रतिमा आपल्या डोळ्यातल्या पडद्यावर १/१० सेकंद इतका वेळ राहते. याचाच फायदा घेऊन सिनेमाची फिल्म काढली जाते. एखाद्या फिल्मचा दोन-चार फुटांचा तुकडा प्रकाशात धरून बघा. सगळी चित्रं तुम्हाला सारखी दिसतील. पण नीट निरखून बघा. प्रत्येक चित्रात थोडासा फरक दिसेल. सिनेमा दाखवताना ही फिल्म भर्रकन डोळ्यासमोरून जात असते. त्यातले प्रत्येक चित्र आपल्या डोळ्याच्या पडद्यावर १/१० सेकंद इतका वेळ राहतं; परंतु पहिलं चित्र पुसट होण्याआधी दुसरं चित्र, तिसरं, चौथं चित्र दिसत असतं. प्रत्येक चित्रामध्ये थोडा थोडा फरक असल्याने ती हलताना दिसतात.

**पान क्र.१४ वरील कोड्याचे उत्तर :** **आडवे शब्द** - १. घाम, ३. कोंढाणा, ४. मैत्री, ६. हावडा, ७. सुत, ८. कावीळ, ९. पाव, १०. बाब, ११. मन, १३. कमळ, १४. टोप, १६. रवा, १७. नाक, १८. सुटका, २०. भान, २२. मऊ, २३. वारि, २४. रावा, २६. गजानन, २७. लाज, २८. वर

**उभे शब्द** - २. महादेव, ३. कोंडा, ७. सुबक, ८. कान, ११. मळ, १२. पोरका, १४. टोक, १५. सासू, १७. नान, १९. टक्का, २०. भाऊ, २१. परिसर, २४. रान




हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १० आषाढ, शके १९३७, १ जुलै २०१५ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे -२ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३० येथून प्रसिद्ध केले.

१



२




# कुमारांच्या कुंचल्यातून...

३



१. चि. प्रणव कुलकर्णी, निगडी, पुणे
२. कु. प्रगती मालपाणी, संगमनेर
३. चि. व्यंकटेश देशमुख, चिखली, पुणे

सौर आषाढ, शके १९३७/जुलै २०१५ पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
प्रकाशन दिनांक : सौर १० आषाढ, शके १९३७ /१ जुलै २०१५
पंजीकरण क्रमांक (RNI NO.) MAHMAR/2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (PHM/SR/201/VIII/2001)
टपालाने सवलतीच्या दरात पाठविण्याचा परवाना क्रमांक : PCW/050 /2015 - 2017,
Posted at S.P. Post Office, Pune - 30, on 1st of Every Month



दापोलीत सकाळच्या वेळी या 'स्वर्गीय नर्तक' (नराची) पक्ष्याची छबी टिपली आहे. – चि. अथर्व सोमण, atharvasoman27@gmail.com

पत्त्यामध्ये चुका असल्यास अथवा पिन कोड क्रमांक नसल्यास कळवा.

सौर दिनदर्शिका
शके १९३७

| | जुलै २०१५ | आषाढ श्रावण |
|---|---|---|
| बु. | 1 | १० |
| गु. | 2 | ११ |
| शु. | 3 | १२ |
| श. | 4 | १३ |
| र. | 5 | १४ |
| सो. | 6 | १५ |
| मं. | 7 | १६ |
| बु. | 8 | १७ |
| गु. | 9 | १८ |
| शु. | 10 | १९ |
| श. | 11 | २० |
| र. | 12 | २१ |
| सो. | 13 | २२ |
| मं. | 14 | २३ |
| बु. | 15 | २४ |
| गु. | 16 | २५ |
| शु. | 17 | २६ |
| श. | 18 | २७ |
| र. | 19 | २८ |
| सो. | 20 | २९ |
| मं. | 21 | ३० |
| बु. | 22 | ३१ |
| गु. | 23 | श्रा.१ |
| शु. | 24 | २ |
| श. | 25 | ३ |
| र. | 26 | ४ |
| सो. | 27 | ५ |
| मं. | 28 | ६ |
| बु. | 29 | ७ |
| गु. | 30 | ८ |
| शु. | 31 | ९ |

**संपर्क पत्ता :**
**छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी**
**५१० सदाशिव पेठ, पुणे 411030**
**☎ (०२०)२४२०७ १७४/१७९**
**www.chhatraprabodhan.org**
ई-मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**या अंकाची किंमत : ₹ २०/–**
**वार्षिक वर्गणी : ₹ २००/–**

**प्रिय पोस्टमन,**

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (⟶) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा–संपादक, छात्र प्रबोधन.

प्रति –